


**प्रा. तेज निवळीकर**

एम.ए.(तत्त्वज्ञान)


- प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागात सन १९७९ पासून कार्यरत.
- पुणे विद्यापीठातील विविध पदांवर कार्य. सध्या **सहयोगी प्राध्यापक** म्हणून कार्यरत.
  माजी मानद समन्वयक – राष्ट्रीय सेवा योजना,
  माजी मानद संचालक – विद्यार्थी कल्याण मंडळ,
  **मानद संचालक** – बहि:शाल शिक्षण मंडळ,
  **मानद संचालक** – ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष.
- विविध सल्लागार मंडळांचे सदस्य : निरंतर शिक्षण धारा, संवादिनी,
  माजी सदस्य – महाराष्ट्र राज्य साक्षरता परिषद ,
  माजी सदस्य – राज्य साधन केंद्र, पुणे.
- विशेष सत्कार / पुरस्कार :
  सामाजिक जाणीव पुरस्कार (बंधुता प्रतिष्ठान, पुणे),
  साक्षरता कार्याबद्दल विशेष पुरस्कार (रोटरी क्लब, पर्वती, पुणे),
  साक्षरता आणि सामाजिक कार्याबद्दल सत्कार
  (महापौर, पुणे महानगरपालिका).
- वेगवेगळ्या दैनिक व नियतकालिकांत ६० लेख प्रकाशित.
- संत गाडगेबाबा यांच्या विचारांचा प्रभाव. □□

## पुणे विद्यापीठ

# राष्ट्रीय एकात्मता


प्रा. तेज निवळीकर



प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग

पुणे विद्यापीठ

## पुणे विद्यापीठ

### प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग

### ध्येय-उद्दिष्टे

**ध्येय :**

उदयोन्मुख ज्ञानाधारित समाजाच्या गरजा भागविणे आणि अध्ययनशील समाजाला शिकण्याच्या संधी पुरविण्याच्या दृष्टीने आजीवन शिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

**उद्दिष्टे :**

- ज्ञान, कौशल्य, माहितीची साधने आणि समाज यांच्यात परस्पर सहकार्य व समन्वय घडवून आणणे.
- ज्ञानविस्तार संकल्पनेचे शैक्षणिकीकरण करणे तसेच शैक्षणिक विभागांना ज्ञानविस्तार कार्यांच्या दिशा देणे.
- जनतेत विशेषत: उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांत सामाजिक व राष्ट्रीय मूल्ये, दृष्टिकोन, कौशल्ये व ज्ञान यांची रुजवणूक-जोपासना करणे.
- ज्ञान आणि इतर संस्थात्मक साधनांच्या देवघेवीतून समाज व उच्च शिक्षणातील दरी कमी करणे.

आपली संस्कृती ही इंद्रधनुष्याची संस्कृती आहे.
इंद्रधनुष्यातील एकेक रंग वेगळे काढले
तर ते दुर्बल ठरतील. त्या सर्वांच्या एकत्र
मिलाफामुळे इंद्रधनुष्याला सौंदर्य प्राप्त होते.
धर्म आणि संस्कृती भिन्न-भिन्न असूनही
आपणा भारतीयांमध्ये मानवता हे एक
मोठे बंधन आहे आणि ते आपणा सर्वांना
एकत्र गुंफू शकते. मानवतेचा खरा अर्थ
जेव्हा आपणास समजेल तेव्हा राष्ट्रीय एकात्मतेच्या
दृष्टीने पुढचे पाऊल समजू शकेल.''

**डॉ. सुरेंद्र बारलिंगे**
[ 'राष्ट्रीय एकात्मता' पुस्तिकेतून ]

*[ केवळ खाजगी वितरणासाठी ]*

# क्षणचित्रे






## मा. कुलगुरू
## डॉ. रघुनाथ शेवगांवकर यांचा
## शुभसंदेश

पुणे विद्यापीठाची स्थापना ही महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासासाठीची एक अविस्मरणीय घटना आहे. अनेक सामाजिक मूल्यांची रुजवण पुणे विद्यापीठाने आपल्या स्थापनेपासून केली आहे. जागतिक स्तरावर पुणे विद्यापीठाचा एक वैभवशाली व गौरवशाली विद्यापीठ म्हणून ठसा कायमचा आहे. याचबरोबर विद्यापीठाला सामाजिक बांधिलकीचे व समाजऋणाचे भान आहे.

पुणे विद्यापीठाचा प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग याच भावनेतून कार्यरत आहे. समाजातील अनेक घटकांच्या शैक्षणिक व सामाजिक उत्थापनासाठी या विभागाचे विविध उपक्रम सतत चालू आहेत. स्वयंसेवी संस्था, राष्ट्रीय एकात्मता, महिला सबलीकरण, ज्येष्ठ नागरिक, आणि असंघटित कामगार यांसाठी या विभागातील अध्यापकांनी पुस्तकरूपात अध्ययन साहित्य विकसित केले. या साहित्याचा उपयोग विविध चर्चासत्रे, शिबिरे यांतून अध्यापक, कार्यकर्ते यांच्यासाठी संदर्भ साहित्य म्हणून केला जातो. या अध्ययन साहित्याच्या दुसऱ्या आवृत्तीनिमित्त मी प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागास आणि या विभागातील लेखक अध्यापकांना हार्दिक शुभेच्छा देतो.

३१ मार्च, २०१०

**डॉ. रघुनाथ शेवगांवकर**
**कुलगुरू,**
**पुणे विद्यापीठ.**



# प्रस्तावना

विद्यापीठ अनुदान आयोगाने अध्यापन आणि संशोधनाबरोबरच ज्ञानविस्ताराचा केलेला स्वीकार आणि पुणे विद्यापीठाने लोकभाषा आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासाबरोबरच लोकशिक्षणाच्या दृष्टीने सामाजिक बांधिलकीचा धरलेला आग्रह या बाबींतून प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागाचा उदय आणि विकास झालेला आहे, याच भूमिकेतून समाजातील विकासापासून वंचित असलेल्या अनेक घटकांसाठी विभागातर्फे विद्यापीठ आणि महाविद्यालय पातळीवर चर्चासत्रे, कार्यशाळा, शिबिरे, ज्ञानविस्तार व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचबरोबर संशोधन, साहित्यनिर्मिती, माहितीपट, संकलन अशा बाबतींतही विभाग कार्यरत आहे.

विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि प्राध्यापक, विविध सामाजिक व शैक्षणिक संस्था, अभ्यासक, कार्यकर्ते यांच्या सहकार्याने स्वयंसेवी संस्था, राष्ट्रीय एकात्मता, असंघटित कामगार, महिला सबलीकरण, ज्येष्ठ नागरिक, लोकसंख्या शिक्षण हे आणि असे विविध अभिनव उपक्रम आयोजित केले जातात. या विविध कार्यक्रमांसाठी व त्यांतील उपक्रमांसाठी विविध स्तरांवरील अभ्यासक, कार्यकर्ते, विद्यार्थ्यांसाठी आमच्या विभागातील अध्यापकांनी विकसित केलेल्या अध्ययन साहित्याची दुसरी आवृत्ती प्रकाशित होत आहे, यासाठी मा. कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगांवकर यांची प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले. तसेच या अध्ययन साहित्याच्या प्रथम आवृत्तीस तत्कालीन कुलगुरू मा. डॉ. नरेंद्र जाधव यांचा शुभसंदेश लाभला होता. या मान्यवरांचे आम्ही आभारी आहोत.

पुणे विद्यापीठ हे विद्यार्थिकेंद्रित असून समाजाभिमुख आहे. सदर साहित्याचे सुज्ञ वाचक स्वागत करतील, असा विश्वास आहे.

३१ मार्च, २०१०

**प्रा. डॉ. धनंजय लोखंडे**
**संचालक व विभागप्रमुख,**
प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग,
पुणे विद्यापीठ.

# क्षणचित्रे



विद्यार्थी, अध्यापक आणि सामाजिक कार्यकर्ते
यांच्यासाठी अध्ययन साहित्य

# राष्ट्रीय एकात्मता

प्रा. तेज निवळीकर

प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग,
पुणे विद्यापीठ

प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभाग
पुणे विद्यापीठ, पुणे-४११००७

**राष्ट्रीय एकात्मता**

मुद्रक व प्रकाशक :
**डॉ. माणिक ल. जाधव**
कुलसचिव,
पुणे विद्यापीठ,
पुणे-४११००७

© लेखक

प्रती : १०००

प्रथम आवृत्ती : २००९
द्वितीय आवृत्ती : २०१०

मुद्रण-स्थळ :
पुणे विद्यापीठ मुद्रणालय,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,
पुणे-४११००७.
[ पु.वि.मु.-१०००-४-२०१० (१२७५) ]

# ऋणनिर्देश

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व ख्यातनाम साहित्यिक आणि विचारवंत डॉ. नरेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाने प्रस्तुत अध्ययन साहित्यनिर्मितीस प्रेरणा मिळाली. माजी प्रभारी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांनी या अध्ययन साहित्याची द्वितीय आवृत्ती प्रकाशित करण्यासाठी उद्युक्त केले.

पुणे विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू, विज्ञान-तंत्रज्ञानाचे तज्ज्ञ आणि ख्यातनाम संशोधक, विचारवंत डॉ. रघुनाथ शेवगावकर यांच्या प्रेरणेने प्रस्तुत अध्ययन साहित्याची द्वितीय आवृत्ती प्रकाशित होत आहे.

पुणे विद्यापीठ - प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार मंडळाच्या उपसमितीने हे साहित्य प्रकाशित करण्यासाठी उद्युक्त केले. सदर उपसमितीचे सर्व सन्माननीय सदस्य - प्रा. डॉ. दिलीप उके (अध्यक्ष), डॉ. शिवाजीराव मोहिते, डॉ. कैलास सोनवणे, प्रा. डॉ. धनंजय लोखंडे (विद्यमान विभागप्रमुख व सदस्य सचिव) यांचे मार्गदर्शन मिळाले.

प्रस्तुत अध्ययन साहित्य तयार करताना या क्षेत्रातील अनेक मान्यवरांचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर पुणे विद्यापीठ मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. दत्तात्रय कुटे व सेवक, प्रूफ-रीडर श्री. म. द. पाठक तसेच प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सहकारी यांचे सहकार्य लाभले. याशिवाय ज्या व्यक्तींचे आणि संस्थांचे सहकार्य मिळाले, त्यांचे आभार !

**—प्रा. तेज निवळीकर**

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. मी प्रथम भारतीय ! | .. | ०१ |
| २. व्यक्तीकडून समाजाकडे | .. | ०३ |
| ३. भारतीय संविधान आणि सप्तस्वातंत्र्ये | .. | ०९ |
| ४. राष्ट्रीय विशेष | .. | ११ |
| ५. मूलभूत कर्तव्ये | .. | १३ |
| ६. मानवधर्माचे महत्त्व | .. | १८ |
| ७. विशेष प्रयत्नांची गरज | .. | २४ |
| ८. सामाजिक लोकशाहीची गरज | .. | २८ |
| संदर्भ | .. | ३१ |


❑❑

# राष्ट्रीय एकात्मता

## १. मी प्रथम भारतीय !

राष्ट्रीय एकात्मतेविषयी विचार करताना **'राष्ट्र'** आणि **'देश'** या दोन संकल्पनेत फरक केला पाहिजे. राष्ट्र या कल्पनेत भावनिक एकात्मता अपेक्षित आहे. भौगोलिक दृष्ट्या विशिष्ट असा जो भूभाग असतो, त्याला 'देश' म्हणता येईल. विशिष्ट अशा भूभागात माणसांचा समूह एकत्र असतो आणि तो भावनिक व सांस्कृतिक दृष्ट्या एकत्र असतो. समान ध्येयाने प्रेरित असतो. मूल्यांची समता असते. एकमेकांच्या सुखदुःखात सहभाग असतो. अशी भावनिक एकात्मता असणाऱ्या भूभागाला 'राष्ट्र' म्हणतात. एखाद्या राष्ट्राच्या भौगोलिक सीमा हा त्या राष्ट्राचा भूभाग असेल, परंतु त्याबरोबरच त्या राष्ट्राला इतिहासपण असतो, परंपरा असतात, संस्कृती असते, ती त्या राष्ट्राची वैशिष्ट्ये असतात. त्यांचा समन्वय म्हणजे एकात्मता. एकात्मता म्हणजे व्यक्तींची भावनिक मने जोडण्याची प्रक्रिया आहे. राष्ट्रातील समाजघटकांचा सुखदुःखाचे वाटेकरी म्हणून सहभाग असणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय एकात्मता म्हणत असताना फक्त घटनात्मक व कायदेशीर एकात्मता अपेक्षित नाही, तर मनाची एकी आवश्यक असते. या दृष्टीने भारताचा विचार केल्यास 'विविधतेत एकता' हे भारताचे खास वैशिष्ट्य आहे. येथे अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा, वेशभूषा असल्या तरीही जेव्हा-जेव्हा राष्ट्रावर एखादे संकट येते त्या वेळी सर्व समाज एकत्र झालेला दिसतो. देशाच्या पातळीवर सांस्कृतिक एकता अनेक वेळा आढळून येते. **'मी** धर्माने, जातीने, भाषेने जरी वेगळा असलो तरीही मी प्रथम भारतीय आहे.' याची जाणीव व्यक्तीला सतत होत असते. भारतात काही वेळा धर्म, जात, पंथ यांच्या नावावर समाजस्वास्थ्य बिघडविणाऱ्या व राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणाऱ्या घटना घडत असतात. अशा वेळी देशातील सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ यांनी खास प्रयत्न करून सामाजिक सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी आज मोठ्या प्रमाणात तरुणांनी खास प्रयत्न केले पाहिजेत. एक राष्ट्र म्हणून जगात टिकावयाचे असेल तर तरुणांनी भावनिक एकात्मता निर्माण करण्यासाठी संकुचित दृष्टिकोन सोडून दिला पाहिजे. यासाठी नुसता तत्त्वतः विचार मांडून चालणार नाही, तर विचारांना कृतीची जोड त्याला द्यावी लागेल.

इंग्रजी राजवटीत या देशात अनेक संस्थानिक होते. ते आपआपल्या पद्धतीने राज्य करीत होते. इंग्रजांनी कधीही एकात्मतेचा विचार केला नाही. त्यामुळे सर्व भारतीय जनता संकुचित अशा जगात वावरत राहिली. परंतु, एवढे असूनही अनेक वर्षांच्या परंपरेमुळे भारतामध्ये सांस्कृतिक एकता नांदत होती. काही परकीय शक्ती येथे फुटीरतेला खतपाणी घालत असल्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न जटिल होऊन बसलेला आहे. या देशावर अनेक वेळा आक्रमणे झालीत. एक आक्रमण शांत होत नाही तोच दुसरे, तिसरे आक्रमण होत राहिले. येथे आलेल्या भिन्न-भिन्न वंशाचे लोक येथेच वस्ती करून राहिले. त्यांत आर्य आले. शक, कुषाण, हूण आले. अरबी, तुर्की वंशाचे लोक आले. यांशिवाय इतर वंशांचेही लोक येथे वेळोवेळी आलेले दिसतात. याशिवाय बाहेरून आले किंवा नाही हे माहीत नसलेले हजारो जातींचे लोक मुंडा, गोंड, कोरकू, वारली, इत्यादी अनेक जमातींचे एतद्देशीय लोक येथे स्थायिक आहेतच. असे असूनही भारत लोकशाही राष्ट्र म्हणून यशस्वी वाटचाल करीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना तयार केली. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये रुजली पाहिजेत, असा आग्रही दृष्टिकोन डॉ. आंबेडकर यांनी मांडला. ही मूल्येच एकात्मता साधण्यासाठी उपयोगी आहेत. भारतीय नागरिक हा या मूल्यांच्या संस्कारांवर वाढला पहिजे. तरच कितीही विविधता असली, वेगळेपण असले तरीही बंधुत्वाच्या विचाराने एकमेकांत प्रेम निर्माण होते आणि व्यक्तीच्या विकासाबरोबरच राष्ट्राचाही विकास होत राहील. त्यासाठी सर्वांना स्वातंत्र्य आवश्यक असते. समानतेचा विचार जीवनात येतो. धर्मनिरपेक्षता आचरणात येण्यास मदत होते. **'मला माझा धर्म प्रिय आहे. परंतु, माझ्या धर्माप्रमाणेच दुसऱ्यालाही दुसरा धर्म प्रिय असू शकतो. आणि त्याचा मी आदर केला पहिजे' असा परिपक्व विचारांचा स्वीकार झाला तर राष्ट्रउभारणीला वेळ लागणार नाही.** भारतीय राज्यघटनेने राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्यासाठी ही मूल्ये सांगितली असली तरीही औपचारिक, अनौपचारिक व सहज शिक्षणातून ही मूल्ये रुजण्यासाठी खास प्रयत्नांची गरज आहे.

आपल्या देशातील समाजजीवनातील आंतरविरोध टाळण्यासाठी **'आम्ही एक आहोत'** हा संकल्प केला पाहिजे. मीपेक्षा आम्ही अशी भूमिका समाजमनांत रुजणे आवश्यक आहे. 'मी प्रथम या राष्ट्राचा नागरिक आहे व

मग मी हिंदू, मुस्लीम, शीख असे असावे. कारण या नागरिकत्वानेच आपण एकमेकांना बंधुतेकडे नेत असतो' अशी भावना रुजवली जाणे आवश्यक! भारताचा सच्चा नागरिक म्हणवून घ्यायचे असेल तर जीवनाचे सर्वांगीण लोकशाहीकरण झाले पाहिजे. लोकशाही ही केवळ राजकीय संकल्पना नाही, तर रोजच्या जीवनात विचार, निर्णय, कृती या तिन्ही गोष्टींत लोकशाहीचा विचार दिसला पाहिजे आणि म्हणूनच असे म्हणावेसे वाटते, लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे असा विचार एकदा रुजला तर आपोआपच संघर्ष टळतो. द्वेष, मत्सर जातो. **'जसा मला जगण्याचा हक्क आहे, मी माझे विचार निर्भयपणे मांडू शकतो, त्याचप्रमाणे इतरांनाही तो अधिकार आहे.'** ही संकल्पना सर्वांनीच मानली पाहिजे. यातूनच चिरंतन भारतीय व्यवस्थेची निर्मिती होईल. हा विचार नुसता स्वप्नदर्शी नाही तर प्रत्यक्षात आचरणातही येऊ शकेल. त्यामुळेच भौतिक समृद्धीकडे जाता येईल. भौतिक गरजा भागल्या तर राष्ट्रीय एकात्मता येण्यास मदतच होणार आहे. परंतु, त्यासाठी आपण भारतीय संस्कृती जपत असतानाच आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले पाहिजे. धार्मिक सलोखा घडवून आणला पाहिजे. याशिवाय अजूनही वेगवेगळे उपक्रम करू शकलो तर राष्ट्रीय एकात्मता येण्यास मदतच होईल.

**२. व्यक्तीकडून समाजाकडे :**

व्यक्ती जगत असताना तीन स्तरांवर जगत असते—काही व्यक्ती केवळ **'मी'**चा विचार करून जगतात. काही **'आम्ही'** म्हणून जीवन जगतात. तर काही **'आमचं'** म्हणून जीवन जगतात. 'मी' म्हणून जगणारी व्यक्ती केवळ स्वतःचाच विचार करते. स्वार्थासाठी, स्वतःच्या प्रगतीसाठी जीवनात धडपडत असते. 'मला दुसऱ्याचे काय करावयाचे आहे? मला मिळाले म्हणजे संपले.' असा संकुचित दृष्टिकोन ठेवून समाधान मानले जाते.

काही व्यक्ती **'मी'**मधून 'आम्ही'मध्ये येतात. माझे कुटुंब, माझे जातवाले, यांचा स्वार्थ साधला म्हणजे सर्व मिळाले यातच धन्यता मानली जाते. या जाणिवेतूनच जाती-जातींत, धर्मा-धर्मांत संघर्ष होताना दिसतो.

काही व्यक्ती मी आणि आम्ही याच्या पुढे जाऊन 'आपण, आपलं, समाज' यांच्याशी नाते जोडतात. मी, आम्ही बरोबरच समाजाचेही भले झाले पाहिजे याचा सतत विचार करतात. केवळ स्वार्थ साधून चालत नाही किंवा

आपल्याच धर्मातील, जातीतील, कुटुंबातील व्यक्तींचीच प्रगती झाली पाहिजे असे नाही तर व्यापक असा एकत्रित समाज प्रगत झाला पाहिजे. 'संपूर्ण समाज प्रगत झाला तर त्यात माझी, कुटुंबाची आपोआपच प्रगती होईल' असा दृष्टिकोन ठेवता येतो. या दृष्टीने महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, महात्मा जोतीबा फुले अशा अनेकांची उदाहरणे देता येतील. ह्या सर्व माणसांनी समाजाच्या सुखात स्वतःचे सुख मानले. समाजाचे दुःख हे स्वतःचे दुःख आहे असे मानले. अशा स्वरूपाची जाणीव वाढीस लागली तर राष्ट्रीय एकात्मता येण्यास मदतच होईल. राष्ट्रीय एकात्मता एक व्यापक जाणीव आहे. यासाठी केवळ उपक्रम करून चालणार नाही, तर या जाणिवेचा संबंध व्यक्तीच्या आचरणाशी, वर्तनाशी जोडला पाहिजे. व्यक्तीचे आचरण होताना त्याचा परिणाम राष्ट्रीयत्वाशी कसा आहे हे कळले पाहिजे. एखादी गोष्ट मला पटते म्हणून मी करणे एवढे मर्यादित उद्दिष्ट ठेवून चालणार नाही. माझ्या वर्तनाने, आचरणाने, उच्चाराने इतरांची मने दुखावणार नाहीत ना, किंवा माझ्या कृतीने राष्ट्रीयत्वाला धोका नाही ना याचा विचार झाला पाहिजे. स्वांतत्र्य तर आहेच, परंतु माझ्या स्वांतत्र्यामुळे इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही ना याची काळजी घेणे आवश्यक असते. इतरांच्या प्रगतीत, इतरांच्या असण्यात माझेही हित आहे. इतरांच्या असण्यामुळे माझे व्यक्तिमत्त्व सुधारते, माणूस म्हणून मी उभा राहू शकतो, नुसत्या भौतिक जीवनावर जगत नाही, तर त्यासाठी काही मूल्ये, संस्कृती यांचीही भूक इतरांच्या साह्याने मला भागविता येते. इतरांचा आदर करणे, कौतुक करणे हेही अपेक्षित असते.

राष्ट्रात राहणाऱ्या व्यक्तींनी समूहाला अप्रगत ठेवून, केवळ माझीच प्रगती झाली पाहिजे असा विचार ठेवल्यास ती खरी प्रगती असू शकत नाही. एखाद्या राष्ट्राचे क्षेत्रफळ किती मोठे आहे किंवा एखाद्या राष्ट्राची लोकसंख्या किती मोठी आहे, एखादे राष्ट्र किती निसर्गसंपन्न आहे. एवढ्यावरच प्रगत राष्ट्राचे निकष मानता येत नाहीत, तर त्या राष्ट्रात राहणाऱ्या अनेक व्यक्तींचा जीवनस्तर कसा आहे (क्वॉलिटी ऑफ् लाइफ) यावरच प्रगतीचे निकष ठरविता येतात. केवळ भौतिक विकास होऊन चालणार नाही. आयुष्याच्या गुणवत्तेसाठी राष्ट्रात राहणारा बहुसंख्य समाज सांस्कृतिक आणि राष्ट्रीय जाणिवेने किती पुढे आहे हे महत्त्वाचे ठरते.

केवळ अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण एवढ्यांवरच जीवन समृद्ध होते असे नाही तर व्यक्तीच्या आवडीनिवडी, छंद, स्वातंत्र्य, तिची इतरांशी मैत्री, राष्ट्राच्या प्रगतीबद्दलची तळमळ, ध्येयासाठी संघर्ष हेही महत्त्वाचे असते. आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते 'भौतिक गरजांबरोबरच सांस्कृतिक गरजही व्यक्तीला विकासासाठी आवश्यक ठरते'. परंतु, त्यासाठी जोपर्यंत राष्ट्रीय एकात्मतेचा दृष्टिकोन येत नाही तोपर्यंत व्यक्तींना मर्यादित परिघातच राहावे लागते.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तत्त्वज्ञ व पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी त्यांच्या 'राष्ट्रीय एकात्मता' या पुस्तिकेत पुढीलप्रमाणे विचार मांडले आहेत :

*''आपली संस्कृती ही इंद्रधनुष्याची संस्कृती आहे.*
*इंद्रधनुष्यातील एकेक रंग वेगळे काढले*
*तर ते दुर्बल ठरतील. त्या सर्वांच्या एकत्र*
*मिलाफामुळे इंद्रधनुष्याला सौंदर्य प्राप्त होते.*
*धर्म आणि संस्कृती भिन्न-भिन्न असूनही*
*आपणा भारतीयांमध्ये मानवता हे एक मोठे*
*बंधन आहे आणि ते आपणा सर्वांना एकत्र*
*गुंफू शकते. मानवतेचा खरा अर्थ जेव्हा*
*आपणास समजेल तेव्हा राष्ट्रीय एकात्मतेच्या*
*दृष्टीने पुढचे पाऊल समजू शकेल.''*

भारतीय संस्कृती विविधतेने नटलेली आहे. म्हटले तर त्यात वेगळेपण दिसेल, परंतु ते एकमेकांच्या विरोधी नाही. इंद्रधनुष्याचे जे सौंदर्य आहे, तसेच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. काही माणसे एकत्र केली म्हणजे तो समाज होत नाही. **कम्युनिटी व सोसायटी या दोन संकल्पनांत फरक आहे. 'कम्युनिटी' म्हणजे समूह व 'सोसायटी' म्हणजे समाज.** केवळ भौतिक गरजेपोटी काही लोक एकत्र राहू लागले, तर तो माणसांचा कळप होईल. परंतु, विशिष्ट अशा ध्येयाने, विचाराने प्रेरित होऊन काही मूल्ये साध्य करण्यासाठी विशिष्ट असा मानवी समूह एकत्र आला तर त्याला समाज म्हणता येईल. कम्युनिटीमध्ये 'शक्ती' हा निकष असतो. बळी तो कान पिळी हा न्याय असतो. जगण्यासाठी जे लायक असतील ते जगतील. दुसऱ्याचा

विचारच नसतो. परंतु समाज या संकल्पनेत सामाजिक न्याय हा निकष असतो. मानवी समूहात भौतिक गरजांबरोबरच सामाजिक न्याय हे मूल्य मानले जाते. समूहातील एखादी व्यक्ती वा व्यक्तिसमूह दुर्बल, पंगू असेल तरीही त्यांना बरोबरीने, समानतेने वागविले जाते आणि म्हणूनच एकीकरण व एकात्मता या दोन गोष्टी भिन्न आहेत. केवळ काही माणसे एकत्र आली म्हणजे एकात्मता आली असे होत नाही, तर एकात्मतेसाठी एकामेकांमध्ये भावनिक गुंतवणूक असणे आवश्यक आहे. मूल्यांची समता असणे आवश्यक आहे. व्यक्तीच्या गुणवत्तेप्रमाणे त्या व्यक्तीला संधी मिळणे आवश्यक असते. असे वातावरण तयार झाले तरच राष्ट्रीय एकात्मता साध्य होऊ शकते.

आपल्या देशात हिंदू जैन, बौद्ध, यहुदी, ख्रिश्चन, मुसलमान आणि शीख यांबरोबरच इतर धर्मांचे लोकही गुण्यागोविंदाने नांदत आहेत. भूखडांची किंवा देशाची कल्पना आपल्या देशात फार प्राचीन आहे. त्यामुळेच भारत, भरतवर्ष, जंबुद्वीप, हिंदुस्तान, इत्यादी नावांनी आपल्या देशाचे नामकरण झाले आहे. सर्व लोकांचा स्वार्थ, सर्वांचे इंटरेस्ट समान असतात तेव्हा मैत्री उद्‌भवते आणि राष्ट्रपण निर्माण होते. खरे तर मानवता हासुद्धा एक धर्म आहे. आपण सारे भाऊ-भाऊ आहोत ही कल्पनासुद्धा आपल्याला एकत्र ठेवू शकते. परंतु, व्यवहारांत भिन्न-भिन्न संस्कृतीच्या शक्ती वावरताना दिसतात आणि मग मानवता या मूल्याला तडा जातो. धर्माच्या विचारांमुळेच पाकिस्तान राष्ट्र निर्माण झाले; परंतु पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तानची भाषा व संस्कृती वेगळी त्यामुळे एकात्मता निर्माण होऊ शकली नाही.

भारतीय संस्कृतीचा विचार करीत असताना आपल्यात असलेल्या भिन्नत्वाचा विचार करावा लागेल. तर दुसऱ्या बाजूला आपण सर्व मानव आहोत ही जाणीव ठेवून माणुसकी जागी करावी लागेल. कदाचित, प्रत्येक धर्मातला देव वेगवेगळ्या रूपांत सांगितला असला तरीही राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने संत गाडगेबाबा यांनी पुढीलप्रमाणे सांगितलेला विचार महत्त्वाचा वाटतो :

''मायबापहो! देव तीर्थात नाई, मूर्तीत नाई, रानवनांत नाई, थो तुमच्या समोर दरिद्री नारायणाच्या रूपात पर्तक्ष उभा हाये. त्याचीच जीवभावाले सेवा करा.

भुकेल्याले जेवन. तान्हेल्याले पानी. उघड्यानागड्याइले वस्तर. बेघराले आसरा. बेकाराइले रोजगार, दुःखी, निरास झाल्या लोकाइले हिंमत द्या. गरीब मुलाइले शिक्षण करा. गरिबाइच्या लग्नाले मदत द्या. अंध, पंगू रोग्याइले औशद द्या. मुक्या प्रान्याइले अभय द्या. हेच हाये देवपुंजा, अन् ह्योच हाये रोकडा धर्म!''

गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।

*(संपादक : प्राचार्य रा. तु. भगत, अमृतवाणी, पृ. ४१)*

दीन-दलितांच्या रूपाने देव या जगातच राहत असतो. दुःखी माणसाची सेवा हाच रोकडा धर्म आहे, असा गाडगेबाबांनी त्यांच्या कीर्तनातून विचार मांडला. गाडगेबाबा कोणत्याही औपचारिक शिक्षणसंस्थेत शिकलेले नव्हते. तर समाजाच्या विद्यापीठातच ते शिकले. डोळसपणाने समाज वाचला. संकुचितपणा सोडून दिला. त्यामुळेच ते निरक्षर असूनही समाजशिक्षणाचे काम प्रबोधनाच्या रूपाने कीर्तनाच्या माध्यमातून करू शकले.

आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत संपूर्ण जग एक खेडे होऊ पाहत आहे. संप्रेषणाच्या वेगवेगळ्या साधनांद्वारे सारे जग जवळ येत आहे. परंतु, माणूस माणसापासून तुटत आहे हे भयाण वास्तव अनुभवाला येत आहे. माणसा-माणसांत दुरावा निर्माण होत आहे. अशा वेळी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने गाडगेबाबांचे विचार अधिक सयुक्तिक वाटतात.

एखाद्या राष्ट्रात एकात्मता साध्य करणे म्हणजे राष्ट्र बलवान करणे आहे. राष्ट्र बलवान करणे म्हणजे त्या राष्ट्रात राहणाऱ्या नागरिकांना सुशिक्षित बनविणे. त्यांच्यातील अंधश्रद्धा नाहीशी करून त्यांना विज्ञाननिष्ठ करणे महत्त्वाचे आहे. आपल्या देशात अनेक लोक निरक्षर आहेत. त्यांना तसेच राहू देऊन राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रयत्न करणे हे अपूर्ण होईल. शिक्षणाशिवाय माणूस हा केवळ पशूसारखाच आहे. शिक्षण हे सर्व सुधारणांचे महाद्वार आहे. शिक्षण हीच खरी संपत्ती होय. हा विचार गाडगेबाबांनी समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला. यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण ते कीर्तनातून सांगत असत. शिक्षणामुळे राष्ट्रीय जाणीव येण्यास मदत होते. हा विचार ओळखूनच गाडगेबाबांनी पुढीलप्रमाणे विचार कीर्तनातून मांडले :

‘‘हे बरेच लोक गरिबीत का राहिले? एक तर याहीले नाही विद्या. काय नाही?

– वि ऽ द्या.

ज्याले विद्या नसेल त्याले खटाऱ्याचा बैल म्हटलं तरी – चाले ऽ ल !

आता तरी सुधरा. आता तरी मुलाले शिक्षण द्या. पैसे नाही म्हनाल तर जेवनाचं ताट मोडा. हातावर भाकरी खा. बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या. इव्हायाला पाहुनचार करू नका. पन आपल्या मुलाले शाळेत घातल्याविने सोडू

– न ऽ का !

विद्या मोठं धन आहे. यातलेच मानसं दिल्लीच्या तक्तावर भाशेन करतात. अनि यातलेच मानसं बोरीबंदरच्या ठेसनावर पोते उचलतात. हेही मानसं अनि तेही मानसं, पन बाप्पा ते एक इद्या शिकले म्हनून दिल्लीच्या तक्तावर भाशेन करू लागले!’’

गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।

*(संपादक : प्राचार्य रा. तु. भगत, अमृतवाणी, पृ. १७)*

एकापेक्षा अधिक माणसे एकत्र येण्याची माणसाला गरज वाटते. आपला स्वतःचा समाज निर्माण करण्याअगोदर माणूस आपले एक नीतीचे जग निर्माण करतो. एकेकाच्या वाट्याला येणारे दुःख कमी करण्याकरिता माणूस संस्था निर्माण करतो. कुटुंबसंस्था, लोकशाही, धर्म, जात, विवाहसंस्था, इ. सर्व घटक मानवनिर्मित जगाचे घटक आहेत. आणि याच जगात विषमता, संघर्ष निर्माण होतात. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते आणि मग त्यासाठी शिक्षण, संस्कार, मूल्ये यांची गरज लागते. प्रत्येक माणसात जेवढ्या प्रमाणात समतेची जाणीव उत्पन्न होईल तेवढ्या प्रमाणात हे दुःख कमी होणार आहे. भगवान बुद्धाने जो दुःख कमी करण्याचा मार्ग सांगितला त्यात दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. अविद्येमुळे दुःख उत्पन्न होते. पण प्रज्ञेमुळे त्यावरचा उपाय सापडतो. आपल्या कोणत्या नातेवाइकाचा मृत्यू झाला तर आपल्याला दुःख होते. तसेच दुसऱ्याच्या नातेवाइकाचा मृत्यू झाला तर संबंधित नातेवाइकास शोक होतो. दुसऱ्याच्या शोकात आपल्यालाही दुःख होते. त्यालाच आपण करुणा म्हणतो. या करुणेमुळे माणूस एकमेकांशी बांधला जातो व त्यातून जवळीक निर्माण होते. ती राष्ट्रीय एकात्मतेला पूरक असते.

## ३. भारतीय संविधान आणि सप्तस्वातंत्र्ये :

दि. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे संविधान बनविण्यासाठी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली घटना समितीची स्थापना झाली. घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी जी समिती नेमली होती तिच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची नियुक्ती झाली होती. या वेळी जगातील वेगवेगळ्या देशांतील राज्यघटनांतील तरतुदींचा अभ्यास व घटना परिषदेत विविध सभासदांनी केलेल्या सूचना या सर्वांचा अभ्यास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी घटना परिषदेत संपूर्ण संविधान मंजूर करून घेतले आणि २६ जानेवारी, १९५० पासून तिचा अंमल सुरू झाला.

संविधानाचे प्रतिज्ञापत्र किंवा संकल्पपत्र तयार केले. त्यात राष्ट्रीय एकात्मतेचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला. खरे तर राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने हा एक प्रकारचा वैचारिक, तात्त्विक पायाच मांडण्यात आला. हे प्रतिज्ञापत्र किंवा संकल्पपत्र पुढीलप्रमाणे आहे :

> ''आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम,
> समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य
> घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांना
> सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार,
> अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे
> स्वांतत्र्य, दर्जाची व संधीची समानता निश्चितपणे
> प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये
> व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि
> एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित
> करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून आमच्या
> संविधानात सभेत आज दि. २६ नोव्हेंबर,
> १९४९ रोजी याद्वारे संविधान अंगीकृत आणि
> अधिनियमित करून स्वतःप्रति अर्पण करीत
> आहोत.''

*(लेखक : पन्नालाल सुराणा, भारत राष्ट्राची जडणघडण, पृष्ठ क्र. ७५)*

या संकल्पपत्रात प्रजासत्ताकाचा कारभार कसा चालवायचा, त्याची दिशा काय असली पाहिजे याचे स्पष्ट प्रतिबिंब दिसते. देशाचा कारभार न्याय,

स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यांच्या आधारे चालविला जाईल. भारतात एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडवायचे आहे. राजेशाही पद्धतीने कारभार न होता देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कोणतेही निर्णय घेण्यास प्रजासत्ताक राष्ट्र समर्थ असते.

स्वतंत्र राष्ट्र म्हणून आपल्या देशाची प्रगती अभिमानास्पद आहे. देशाचा कारभार लोकशाही पद्धतीने राबविला जातो. सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क मिळाला. नियमितपणे लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य सस्थांच्या निवडणुका होऊ लागल्या. राज्यकारभार पूर्वी इंग्रजी भाषेतून होत होता. तो आता लोकभाषेतून होऊ लागला. केंद्र सरकारच्या कारभारासाठी इंग्रजी व हिंदी या दोन्ही भाषांचा वापर झाल्याने सर्वसामान्य माणसाला कारभारांत भाग घेणे सुलभ झाले. लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे. यासाठी व्यक्तिस्वातंत्र्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे. व्यक्तीला एक सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी हक्कांची गरज असते.

राष्ट्रीय एकात्मतेला पोषक वातावरण तयार करण्यासाठी भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला सात प्रकारांची स्वातंत्र्ये दिली आहेत. उदा. : १) भाषणस्वातंत्र्य, २) जमावस्वातंत्र्य, ३) संघटनास्वातंत्र्य, ४) मालमत्तास्वातंत्र्य, ५) व्यवसायस्वातंत्र्य, ६) संचारस्वातंत्र्य, ७) निवासस्वातंत्र्य, ही सात स्वातंत्र्ये दिल्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचे वातारण तर निर्माण होईलच, परंतु नागरिकांमध्ये देशाबद्दल आपुलकी, जिव्हाळा, एकात्मता वाढीस लागेल. यांतील पहिले स्वातंत्र्य आहे 'भाषणस्वातंत्र्य'. व्यक्ती आपल्या मनातील विचार स्पष्टपणे व्याख्यानाद्वारे मांडू शकते. दुसरे स्वातंत्र्य आहे 'जमाव-स्वातंत्र्य'. कोणत्याही ध्येयाने, विचाराने व्यक्तिसमूह एकत्र येऊन विचार मांडू शकतात. म्हणजेच याचा अर्थ असा की, सभा आयोजित करता येतात. याबरोबरच 'संघटनास्वातंत्र्य' हेही महत्त्वाचे आहे. संघटनेच्या माध्यमातून अनेक जाती, धर्मांचे लोक एकत्र येतात. भाषा, प्रदेश यांचा अभिनिवेश गळून पडतो. एवढेच नाही तर संघटनेच्या माध्यमातून एक प्रकारचा दबाव गटही तयार करता येतो. 'मालमत्तास्वातंत्र्य' हेही तितकेच महत्त्वाचे आहे. व्यक्तीला स्वतःच्या इच्छेप्रमाणे मालमत्ता करण्याचे स्वातंत्र्य असल्याने व्यक्ती कार्यप्रवण असते. 'व्यवसायस्वातंत्र्य' दिल्यामुळे व्यक्ती आपआपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय करू शकते. पूर्वी जातीप्रमाणेच व्यवसायाची विभागणी होती. परंतु आता

या स्वातंत्र्यामुळे जात, धर्माच्या पलीकडे जाऊन कोणत्याही व्यक्ती कोणत्याही व्यवसायाची निवड करू शकते, व आपली प्रगती साधू शकते. 'संचारस्वातंत्र्य' दिल्यामुळे आपल्या देशात कोणत्याही प्रांताची व्यक्ती कोणत्याही प्रांतात जाऊ शकते. प्रवास करू शकते. यामुळे देशातल्या वेगवेगळ्या प्रदेशांबद्दल आपुलकी निर्माण होते. वेगवेगळ्या पर्यटनक्षेत्राला भेटी दिल्यामुळे सांस्कृतिक एकात्मता तयार होते. 'निवासस्वातंत्र्य'मुळे कोठल्याही प्रदेशातील व्यक्ती कोठल्याही प्रदेशात निवास करू शकते, राहू शकते. यामुळे वर्षानुवर्षे पिढ्यान्‌पिढ्या एखादे कुटुंब एकाच ठिकाणी राहत असायचे, परंतु या स्वातंत्र्यामुळे नोकरीच्या निमित्ताने व्यक्ती देशाच्या कोठल्याही भागात राहू शकते हे महत्त्वाचे.

**४. राष्ट्रीय विशेष :**

भारतीय नागरिकाला ही सात स्वातंत्र्ये मिळाल्यामुळे आम्ही भारतीय आहोत, भारत देश माझा आहे असा विचार कुटुंबातील व्यक्तीवर विशेषतः लहान मुलांच्या मनांत रुजविला जातो. या सात स्वातंत्र्यांबरोबरच राष्ट्रीय विशेष हेही महत्त्वाचे आहेत. हे सर्व राष्ट्रीय विशेष आपल्या राज्यघटनेने प्रस्तावित केले आहेत. भारताच्या प्रत्येक नागरिकाला, तरुणाला याची माहिती पाहिजे. यासाठी मुद्दामहून जाणीवजागृतीचे अनेक उपक्रम हाती घेतले पाहिजेत. विशेषतः, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना माहिती होण्यासाठी अभ्यासक्रमा-बाहेरील ज्ञानविस्तार उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय विशेष कोणते आहेत त्याची जाणीव करून दिली पाहिजे. हे **'राष्ट्रीय विशेष'** पुढीलप्रमाणे आहेत :

| | |
|---|---|
| **राष्ट्रगीत : जनगणमन** | **राष्ट्रगीत : वंदेमातरम्** |
| **राष्ट्रचिन्ह(मुद्रा): सिंह/ब्रह्मचक्र** | **राष्ट्रीय बोधवाक्य : सत्यमेव जयते** |
| **राष्ट्रीय प्राणी : वाघ** | **राष्ट्रीय पक्षी : मोर** |
| **राष्ट्रीय फूल : कमळ** | **राष्ट्रीय पंचांग : सौर पंचांग** |
| **राष्ट्रीय भाषा : हिंदी** | **राष्ट्रध्वज : अशोक चक्रांकित तिरंगा.** |

*(संदर्भ : भारत कथा—डॉ. न. म. जोशी, सुविधा प्रकाशन, पुणे-३०)*

या राष्ट्रीय विशेष यांची माहिती व अर्थ कळत गेला तर तरुणांना, विद्यार्थ्यांना, नागरिकांना आपला देश एक आहे ही जाणीव येईल. जरी व्यक्तीची भाषा, प्रांत, वेशभूषा वेगवेगळी असली तरीही राष्ट्र म्हणून आपल्या देशाचा अभिमान व्यक्तीला वाटेल.

राष्ट्रीयत्वासाठी भावनिक एकात्मता महत्त्वाची असते. व्यक्ती तितक्या प्रकृती त्याप्रमाणे अनेक विचारांचे, भिन्न-भिन्न स्वभावांचे लोक जेव्हा एकत्र असतात, तेव्हा निसर्गतः किंवा स्वभावतः मतभेद, संघर्ष निर्माण होतात. परंतु, राष्ट्रीयत्वाची जाणीव असेल तर असे अहंकार, मतभेद, संघर्ष यांत व्यक्ती अडकून पडत नाही. समाजात विषमता आहे, परंतु या विषमतेचे दोन प्रकार आहेत - निसर्गनिर्मित विषमता व मानवनिर्मित विषमता. समाजात काही लोक काळे-गोरे, उंच-ठेंगू, लठ्ठ-बारीक असतात. प्रत्येकाचे स्वभाव, सवयी वेगवेगळ्या असतात. यांत वेगवेगळेपण दिसेल. समानता कोठेही नसेल. परंतु, याला आपण काहीही करू शकत नाही. आहे ती परिस्थिती स्वीकारली पाहिजे. त्यामुळे संघर्षाची भावना कमी होईल. निसर्गनिर्मित विषमता व मानवनिर्मित विषमता यांत फरक एवढ्यासाठी करावयाचा की, नुसती निसर्गनिर्मित विषमता मान्य करून माणूस थांबत नाही तर स्वतःच्या मनाने नव्या-नव्या व्यवस्था निर्माण करतो. त्यामुळे व्यक्तीमध्ये उच्च-नीचतेची भावना निर्माण होते. उदा. - धर्म, जात, स्त्री-पुरुष भेदभाव हे सांगता येतील. धर्म, जात माणसांनी निर्माण केले. परंतु, माझा धर्म सर्वश्रेष्ठ आहे, माझी जात हीच उच्च आहे असा अहंकारी भाव कारण नसतानाही व्यक्तीमध्ये असतो.

निसर्गाने मनुष्य निर्माण केला. त्यात एक स्त्री व पुरुष आहे. यांत माणसाने पुरुषप्रधानतेचा विचार सुरू केला आणि त्यामुळे महिलांना कनिष्ठ वागणूक मिळू लागली. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने हे न्यून आहे. आजही व्यवहारात रोटी-बेटीचा व्यवहार करताना व्यक्ती संकुचितपणे वर्तन करताना दिसतात. जातीचे अहंकार आचरणात दिसतात. मुलांची नावे ठेवतानासुद्धा जातीचाच विचार केला जातो. काही विशिष्ट नावे त्या त्या धर्माप्रमाणे, जातीप्रमाणेच असतात. हे वातावरण आपण लोकशिक्षण प्रबोधनाच्या माध्यमातून बदलू शकतो. हुंड्यासाठी मुलींना आजही जाळले जाते. मुलगी जन्माला येऊ नये म्हणून गर्भपात केले जातात. यामुळे समाजामध्ये समानता, एकात्मता निर्माण होण्यास अडथळा येतो. राजकीय दृष्ट्या विचार केल्यास निवडणुकीसाठी जाती-धर्माप्रमाणे एकगठ्ठा मतांचा विचार होताना दिसतो. अशामुळे समाजात जातीय विचार सतत वाढता राहतो. समाजामध्ये बदल होताना दिसतो, परंतु त्याची दिशा परिवर्तनाच्या दृष्टीने असतेच असे नाही. बदल हा बाह्य स्वरूपाचा असतो तर परिवर्तन हे आंतरिक असते. एखादी गोष्ट व्यक्तीला तत्त्वतः मान्य असते पण ती व्यक्ती कृतीत आणू शकत नाही. ही विसंगती

आहे. विचार, निर्णय, कृती म्हणजे परिवर्तन आहे. नुसतीच भौतिक सुधारणा झाली म्हणजे विचार बदलले असे होत नाही. एखादा परिवर्तनवादी विचार जेव्हा स्वीकारला जातो, तेव्हा तो विचाराच्या पातळीवर मनापासून स्वीकारला पाहिजे. एखादा विचार स्वीकारल्यानंतर आयुष्यात जेव्हा-जेव्हा निर्णय घेण्याची पाळी येईल, त्या त्या वेळी स्वीकारलेल्या विचारांप्रमाणेच निर्णय घेता आले पाहिजेत; आणि घेतलेल्या निर्णयाप्रमाणेच जर आचरण घडले तरच परिवर्तनवादी विचार स्वीकारल्याचे फलित साध्य होईल.

**५. मूलभूत कर्तव्ये :**

लोकशाहीत नागरिक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. परंतु नागरिकांमध्ये सामाजिक जाणीव असणे आवश्यक असते. लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणात लोकशिक्षण, प्रबोधन होणे गरजेचे आहे. लोकशाहीत नागरिकाला वेगवेगळे हक्क प्राप्त तर झालेच पाहिजेत. याविषयी दुमत असण्याचे कारण नाही, परंतु हक्कांबरोबरच कर्तव्येही तितकीच महत्त्वाची आहेत. फक्त हक्कांचीच मागणी करावयाची आणि कर्तव्ये मात्र पार पाडावयाची नाहीत. अशा वेळी लोकशाही व्यवस्थेत विसंगती निर्माण होते. कायदा पाळणे, कर भरणे, ठरवून दिलेल्याप्रमाणे काम करणे अशा स्वरूपाची इतरही कर्तव्ये रोजच्या जीवनात पार पाडली पाहिजेत. इतरांच्या समस्यांचा विचार केला नाही तर मग राष्ट्रीय ऐक्य ज्या प्रमाणात साध्य व्हायला पाहिजे त्या प्रमाणात साध्य होत नाही. यासाठी १९७० साली बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीचे कलम ५१अ नव्याने समाविष्ट करण्यात आले. त्यानुसार पुढीलप्रमाणे कर्तव्ये सांगितलेली आहेत :

१) संविधान, त्याचे आदर्श, संविधानाने निर्माण केलेल्या संस्था, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर करावा. संविधानाप्रति तर नागरिकाची निष्ठा असलीच पाहिजे. परंतु त्याबरोबरच संविधानाने निर्माण केलेल्या संस्था याविषयी नागरिकांत जागरुकता आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाबद्दल अभिमान वाटला पाहिजे, तर राष्ट्रगीत गाताना अभिमानाने छाती फुगली पाहिजे.

२) राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत विकसित झालेल्या उदात्त आदर्शांचे अनुकरण करावे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत अनेक देशभक्त क्रांतिकारकांनी घरावर तुळशीपत्र ठेवून स्वांतत्र्याची चळवळ चालविली. प्रसंगी स्वतःचे बलिदानसुद्धा केले. हे सारे केवळ देशासाठी केले. याची जाणीव ठेवून उदात्त आदर्शांचे अनुकरण करण्याची मानसिकता नागरिकांमध्ये असावी.

३) भारताचे ऐक्य व सार्वभौमत्व जोपासले गेले पाहिजे. परकीय शक्ती सतत ऐक्यविरोधी वातावरण निर्माण करतात. आपल्याच देशातील स्वार्थी, संकुचित मूठभर लोकांना हाताशी धरून देश फोडण्याचा प्रयत्न करतात. साम्राज्यवाद्यांनी या देशाचे तुकडे करण्याचे प्रयत्न केले. या देशात राहणाऱ्या निरनिराळ्या जमातीही एकेक स्वतंत्र राष्ट्र आहे, अशी कल्पना रुजविण्याचे काम करण्यात आले. अर्थात, हे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत ही गोष्ट वेगळी. म्हणूनच, भारत एक सार्वभौम राष्ट्र आहे ही भावना जोपासण्याचे काम झाले पाहिजे.

४) गरज पडेल तेव्हा देशाच्या संरक्षणासाठी आवश्यक ती सेवा द्यावी. आतापर्यंत देशात अनेक वेळा युद्धाची परिस्थिती तयार झाली. काही वेळा प्रत्यक्ष युद्धही करावे लागले. अशा वेळी देशाला संरक्षणासाठी नागरिकांकडून मदतीची गरज लागते. ही मदत वेगवेगळ्या स्वरूपाची असू शकते. अशा वेळी नागरिकांनी राष्ट्राच्या संरक्षणासाठी धावले पाहिजे. गरजेप्रमाणे सेवा दिली पाहिजे. आपल्या देशात नागरिकाने अनेक वेळा अशी सेवा दिलेली दिसते. युद्धपरिस्थितीबरोबरच काही-काही वेळा नैसर्गिक आपत्ती अचानक उद्‌भवते, अशा वेळीही नागरिकांनी मदत केली पाहिजे.

५) सर्व नागरिकांत बंधुभाव वाढावा. धार्मिक, भाषिक, प्रादेशिक किंवा सांप्रदायिक विविधतेमुळे भेदभाव करू नये. स्त्रियांना आदराने वागवावे. लोकशाहीत नागरिकाने बंधुभावाने वागले पाहिजे. या देशात अनेक धार्मिक पद्धती आहेत. प्रत्येकाच्या रूढी-परंपरा वेगवेगळ्या आहेत. दुसऱ्याच्या धर्माला नावे ठेवता कामा नये. एखादी व्यक्ती केवळ अन्य भाषिक आहे म्हणून तिचा द्वेष करता कामा नये. प्रत्येकाचा प्रदेश वेगवेगळा असतो. तरीही अनेक वेळा एकत्र येण्याचा योग येतोच. अशा वेळी नागरिकांचे आचरण सलोख्याचे असले पाहिजे. प्रादेशिक किंवा सांप्रदायिक विविधतेमुळे भेदभाव करणे गैर आहे. याबरोबरच सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांना आदराने वागविले पाहिजे. कारण स्त्री-पुरुष समतेचा विचार महत्त्वाचा आहे. स्त्री ही माणूसच आहे. त्यामुळे माणसाची प्रतिष्ठा तिला दिली गेली पाहिजे. बऱ्याच वेळा स्त्री-पुरुष भेद केला जातो, त्यामुळे स्त्रियांना अनेक संधींना मुकावे लागते.

६) आपल्या संमिश्र संस्कृतीचा वारसा जपावा. आपल्या देशात वेगवेगळे धर्म, जाती, पंथ असल्याने प्रत्येकाचे सांस्कृतिक जीवन वेगवेगळे असू शकते. त्यामुळेच भारत हा एक संमिश्र संस्कृतीचा देश आहे आणि याचा अभिमानच वाटला पाहिजे. अनेक संस्कृती येथे असल्या तरीही सर्व संस्कृती म्हणून एकत्रितपणे विचार केल्यास शेवटी भारतीय संस्कृती म्हणूनच त्या आविष्कृत होतात. कोणत्याही एका संस्कृतीचा हा देश आहे असे कोणी म्हणत नाही. हा देश भारतीय संस्कृती असणारा देश आहे.

७) जंगले, जलाशये, नद्या, वन्यप्राणी यांचे रक्षण करावे. त्यांत सुधारणा कराव्यात. सर्व प्राणिमात्रांविषयी ममत्व बाळगावे. या देशात अनेक जंगले, जलाशये, नद्या, वन्यप्राणी आहेत, यांचे संरक्षण करण्याचे काम भारतीय नागरिकांचे आहे. निसर्गाची संपत्ती मानवी प्रगतीसाठी पूरकच असते. निसर्गाचा ऱ्हास झाला तर मानवी जीवनात भकासपणा येईल. त्यासाठी जंगलाचे संरक्षण, त्या जंगलात राहणारे वन्य प्राणी यांचे संरक्षण झाले पाहिजे. शेतीसाठी नद्यांचा उपयोग होतो. अनेक पशु-पक्षी जलाशये व नद्यांवर अवलंबून असतात. यासाठी या सर्व निसर्गसंपत्तीचे नुसते संरक्षणच करून चालणार नाही, तर त्यात सुधारणा करण्यासाठी झटले पाहिजे. सर्व प्राणिमात्रांविषयी ममत्व बाळगले पाहिजे. या पृथ्वीतलावर जसा माणसाला राहण्याचा हक्क आहे तेवढाच प्राणिमात्रांनाही आहे. हा विचार प्रत्येक नागरिकाने मान्य केला पाहिजे. परंतु, प्रत्यक्ष व्यवहारात मात्र स्वतःच्या छंदासाठी, हट्टासाठी प्राण्यांची शिकार केली जाते. बऱ्याच वेळेला प्राण्यांची शिकार करून कातडे, शिंग, दात इत्यादींचा व्यवसाय केला जातो. हे कृत्य अनैतिक आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी प्राण्यांचा बळी घेतला जातो. यासाठी नागरिकांनी संघटितपणे प्राणिहत्या थांबविली पाहिजे.

८) वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, शोधवृत्ती व सुधारणा करण्याची तयारी अंगीकारावी. नागरिकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन असला पाहिजे. अंधश्रद्धा, रूढी यांमुळे समाजाचे नुकसान झाले आहे. एखादी प्रथा वर्षानुवर्षे चालत आली आहे म्हणून ती पाळलीच पाहिजे असे बंधन नाही. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांत फरक केला पाहिजे. एखाद्या गोष्टीवर

माझा विश्वास असणे वेगळे आणि कशाचाही विचार न करता अंधळेपणाने अंधविश्वास ठेवणे यांत फरक आहे. मी एखादी गोष्ट करतो किंवा वर्तनात आणतो. त्याचे तार्किक समर्थन मला देता आले पाहिजे. तार्किक दृष्टिकोन असेल तरच निर्णय घेण्याची क्षमता तयार होते. रूढी आणि परंपरा यांतही फरक करावयास शिकले पाहिजे. रूढींना विरोध केला पाहिजे, परंतु परंपरा जपल्या पाहिजेत. वाडवाडिलांबद्दलचा आदर, राष्ट्रध्वजाबद्दलचा अभिमान गैर काही नाही. सर्व मानव सारखेच आहेत यावर ठाम विश्वास पाहिजे. मानवतावादी विचार प्रसारित करण्यासाठी नागरिकांनी आपले प्रयत्न केले पाहिजेत. कुतूहल, शोधवृत्ती नेहमी जागी ठेवली पाहिजे. स्वतःबरोबरच समाजाची सुधारणा करण्याची तळमळ अंगी बाणली पाहिजे.

९) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करावे व हिंसा वर्ज्य मानावी.

लोकशाहीत संप करण्याचा अधिकार नागरिकांना जरूर आहे, परंतु हिंसक वळण लागून सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केले जाते, हे अयोग्य आहे. साध्या-साध्या गोष्टींसाठी जेव्हा नागरिक एकत्र येतात, आपल्या मागण्यांसाठी आग्रह धरतात तेव्हा त्यांचे पहिले लक्ष्य एस.टी. बस हे दिसते. यामुळे शासनाचे नुकसान होते असे नव्हे तर ते आपल्यासारख्या नागरिकांचेच नुकसान असते. कारण ही हानी भरून काढण्यासाठी शासन आपण दिलेल्या कराच्या रकमेतूनच पैसे खर्च करते. त्यामुळे ज्या ज्या सार्वजनिक वस्तू आहेत त्यांचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे. आपले एखादे म्हणणे मांडत असताना सामूहिक संघटनापातळीवर जरूर आग्रह धरावा, परंतु हिंसा मात्र वर्ज्य केली पाहिजे. हिंसा केल्याने प्रश्न सुटतातच असे नाही. महात्मा गांधींनी सांगितलेला आहिंसेचा मार्ग अवंलबिला पाहिजे. अहिंसेचे तत्त्व वापरून आपल्या मताप्रमाणे मागणी मान्य करून घेता येते. याचा आदर्श महात्मा गांधींनी त्यांच्या जीवनात दाखवून दिला.

१०) वेगवेगळ्या क्षेत्रांत राष्ट्राची प्रगती व्हावी यासाठी वैयक्तिक व सामूहिक प्रयत्नाने उच्च दर्जा प्राप्त करावा.

कोणत्याही राष्ट्रातील नागरिकांना आपआपल्या राष्ट्राची प्रगती व्हावी असे वाटणे साहजिकच आहे. परंतु, नुसते असे वाटून चालत नाही तर

‘मी ज्या क्षेत्रात काम करीत आहे, त्या क्षेत्रात, मी असे काम करीन की, ज्यामुळे माझ्या राष्ट्राचे नाव अखख्या जगात झाले पाहिजे’ अशी तळमळ लागून राहिली पाहिजे. राष्ट्र प्रगतीला न्यायचे असेल तर कोणत्याही एकाच क्षेत्रात भराभराटी होऊन चालणार नाही, तर सामाजिक, आर्थिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक व अन्य क्षेत्रांतही प्रगती दिसली पाहिजे. केवळ माझी प्रगती करीन असा संकुचित दृष्टिकोन ठेवता येणार नाही; तर राष्ट्राच्या प्रगतीसाठी वैयक्तिक व सामूहिक प्रयत्नाने राष्ट्राला उच्च दर्जा मिळण्याची आकांक्षा बाळगली पाहिजे.

ही सर्व कर्तव्ये संविधानात सांगितली असली तरीही सर्व नागरिक अशा स्वरूपात कर्तव्ये पार पाडतीलच असा भाबडा विश्वास ठेवता येणार नाही. यासाठी शाळा, कॉलेजेसमधून अभ्यासक्रमांत व अभ्यासक्रमांव्यतिरिक्त इतर ज्ञानविस्तार उपक्रमांच्या माध्यमातून ही जाणीव येण्यासाठी मुद्दामहून प्रयत्न करण्याची गरज आहे.

खासकरून सर्व जनसंपर्क माध्यमांचा उपयोग या कामासाठी करून घेतला पाहिजे. दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे व अन्य माध्यमांतून या विचारांचा प्रसार केला पाहिजे. कर्तव्यपालन करणारे नागरिक तयार झाले, तर राष्ट्रउभारणीला वेळ लागणार नाही. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी एक स्वप्न या देशाला दिले की, भारत २०२० साली महासत्ता होऊ शकेल. याप्रमाणे खरेच महासत्ता व्हावयाची असेल, तर गरीब-श्रीमंत, शहरी-ग्रामीण यांतील विषमता नष्ट करावी लागेल. ही सारी विषमता ठेवून महासत्ता होईल असे वाटणे भाबडेपणाचे ठरेल. गरिबी, निरक्षरता, शोषण, भ्रष्टाचार व बौद्धिक प्रदूषण ही पाच विषारी फळे आजही आपल्या समाजवृक्षाला लगडलेली दिसतात.

गरिबी आणि निरक्षरता ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आजही जगामध्ये जितकी राष्ट्रे आहेत त्या सर्व राष्ट्रांच्या निरक्षरांची एकूण संख्या आणि फक्त भारतातील निरक्षरांची एकूण संख्या यांची तुलना केली, तर दुर्दैवाने असे दिसते की, भारतातल्या निरक्षरांची संख्या अधिक आहे. एवढी मोठी निरक्षरांची संख्या ठेवून भारत कसा प्रगत होऊ शकेल? ही निरक्षरता मोठ्या प्रमाणात गरिबांमध्ये आहे. गरिबीमुळे शिक्षणाची संधी ज्या प्रमाणात मिळावयास पाहिजे ती मिळत नाही. त्यामुळे गरिबीचे निर्मूलन

कसे करता येईल, यासाठी कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबविता येतील यासाठी नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजेत. गरिबी कमी झाली, तर साक्षरतेत आपोआप वाढ होण्यास मदत होईल. या दोन गंभीर समस्यांबरोबरच शोषण हेही तितकेच महत्त्वाचे आहे. आजही प्रत्यक्ष व्यवहारात जो मनुष्य घरबांधणीचे काम करतो, मेहनत करतो त्याला आयुष्यात चांगले घर राहावयास मिळत नाही. जो मनुष्य कापूस पिकवितो, समाजाला कापड देतो, वस्त्र देतो त्याला अंगभर कापड मिळत नाही. जो मनुष्य ज्वारी पिकवितो, धान्य पिकवितो त्याला पोटभर भाकरी मिळत नाही. मात्र जो मनुष्य यांतले काहीच करीत नाही त्याला मात्र यांतले भरपूर मिळते. हे असे का होते ? हे तपासले पाहिजे. शोषणावर आधारितच यंत्रणा, व्यवस्थापन असेल तर ती बदलली पाहिजे. ज्याचे शोषण होते त्यालाही आपले शोषण होते हे समजले पाहिजे. यासाठी जाणीवजागृतीची गरज आहे. भ्रष्टाचार तर कमी होण्यापेक्षा जास्तच बळावतो आहे असे दिसते. भ्रष्टाचार केला तरच आपले काम होते ही मानसिकता बदलावी लागेल. बौद्धिक प्रदूषण तर महाभयंकर आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात मनुष्य आपली अस्मिता, संस्कृती विसरतो आहे असे वाटते. एवढेच नाही तर त्याची जीवनशैलीही बदलत आहे. 'रेडिमेड' संस्कृती वाढत आहे.

**६. मानवधर्माचे महत्त्व :**

खरे तर आज आपआपल्या राष्ट्राची अस्मिता जपूनसुद्धा मानवधर्माची जपणूक करणे गरजेचे आहे. मानवता हे मूल्य फार महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार मांडत असताना मानवता असणे हे विरोधी नाही. कारण मानवतेचा विचार माणसामाणसांमध्ये भिन्नता किंवा उच्च-नीचता मानण्याचा नाही. राष्ट्रीयत्वाचा तर विचार असलाच पाहिजे. माझे राष्ट्र मोठे झाले पाहिजे, परंतु त्यामुळे दुसऱ्या राष्ट्राचा द्वेष करण्याची गरज नाही. एका बाजूला आपल्या देशात विविधतेत आपणास एकत्व पाहावे लागेल, आणि दुसऱ्या बाजूला जगातील सर्व मानव समान आहोत याची जाणीव ठेवून आपल्यातील माणुसकी आपणास जागी करावी लागेल. आंतरराष्ट्रीय राजकारणातून आणि अंतर्गत समाजकारणातून एक राष्ट्र या दृष्टीने आपल्या राष्ट्रात एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला पाहिजे.

आपल्या देशात अनेक धर्म, जाती आहेत. ही वस्तुस्थिती मान्य करूनदेखील प्रत्येक धर्मात काही धर्मांध लोक असतात. हे कटू सत्य स्वीकारून मार्गक्रमणा केली पाहिजे. प्रसिद्ध विचारवंत आचार्य शं. द.

जावडेकर यांनी 'हिन्दू-मुसलमान ऐक्य' या ग्रंथात पुढीलप्रमाणे विचार मांडले आहेत :

''हिंदू-मुसलमान, बौद्ध व ख्रिस्ती असे अनेक धर्म आहेत व त्यांच्या अनेक संस्कृती आहेत असे आपण व्यवहारात बोलत असलो व त्या त्या व्यवहारापुरता त्या भाषेत काही अर्थ असला, तर परमार्थत: सर्व धर्म एकाच मानवधर्माची निरनिराळी स्वरूपे आहेत, आणि मानवसंस्कृती हीही खऱ्या अर्थाने एकच आहे हे ओळखून वागण्याचा काळ आज आलेला आहे. आशिया खंडातच सर्व धर्म उगम पावले आहेत व ते आपले एकत्व ओळखू लागतील तरच आशिया खंड मानवसंस्कृतीवर ओढवणारी संकटपरंपरा दूर करण्याचा मार्ग जगाला दाखवून देऊ शकेल. युरोपप्रमाणे आशिया खंडात एकाच धर्माचे व एकाच वर्णाचे लोक नाहीत. या खंडात अनेक धर्मांचे व अनेक वर्णांचे लोक नांदत आहेत. त्या सर्वांनी धर्मभेद, जातिभेद व वर्णभेद विसरून आपले राजकीय, आर्थिक, सामाजिक व आध्यात्मिक व्यवहार करू लागून मानवधर्माची व मानवसंस्कृतीची तत्त्वे समाजाच्या सर्व व्यवहारांत लागू करण्यास झटले पाहिजे. हे एक नवसंस्कृतिस्थापनेचे कार्य असून ते क्रांतिकारक आहे.'' (पृष्ठ क्र. १८२)

आचार्य जावडेकर यांनी वरीलप्रमाणे विचार १९४५ साली मांडलेले आहेत. या विचारांची आजही गरज आहे. भारतीय संस्कृतीने तीन स्तरांवर काम केले आहे - विचार, आचार आणि प्रचार. विचार व आचार यांची फारकत होता कामा नये. भारतीय विचारदर्शनात संपूर्ण जगतकल्याणाचा विचार केलेला आहे. या दृष्टीने संत ज्ञानेश्वरांनी जे पसायदान सांगितले आहे ते फार महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय एकात्मतेचा भाव अंगोअंगी असला पाहिजे. 'वसुधैव कुटुंबकम्'चा विचार पुढच्या पिढीला सांगितला पाहिजे. सर्व संतांनी राष्ट्रीय एकात्मतेचा विचार सांगण्याचा प्रयत्न केला; म्हणून तर नामदेवांचे अभंग पंजाबपर्यंत गेले आहेत. खरे तर धर्मामुळे माणसे जोडली गेली पाहिजेत. जात, धर्म, पंथ यांचा वापर हत्यारासारखा होता कामा नये, त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

सामाजिक बांधिलकीचा विचार प्रत्येक नागरिकात रुजला तर राष्ट्रीय एकात्मता साध्य होण्यास मदत होते. मूल्यशिक्षणात राष्ट्रीय एकात्मता या मूल्यावर अधिक भर दिला पाहिजे. गुजरात राष्ट्रीय विद्यापीठाच्या स्थापनेच्या

वेळी महात्मा गाधींनी राष्ट्रीय एकात्मतेबद्दल विचार व्यक्त करताना राष्ट्रीयत्वाच्या विकासासाठी पाश्चात्त्य देशांतील आधुनिक विज्ञानाप्रमाणे आशियातील संस्कृतीचाही पद्धतशीर अभ्यास होण्याची आवश्यकता प्रतिपादिली. महात्मा गांधींनी कधीही संकुचित विचार केला नाही. शेवटपर्यंत हिंदु-मुसलमान ऐक्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सर्व धर्मांचे लोक या देशात कसे गुण्यागोविंदाने नांदतील याबाबत प्रयत्न केला. अध्यात्म आणि विज्ञान हे एकमेकांच्या विरोधी मानण्याचे कारण नाही. कर्मकांडाला जरूर विरोध असावा, परंतु अनेक व्यक्तिसमूह जेव्हा एकत्र नांदतात तेव्हा नैतिकतेची गरज भासतेच. नीतीचे दोन प्रकार असतात. एक सापेक्ष नीती व दुसरी निरपेक्ष नीती. सापेक्ष नीती स्थलकालाप्रमाणे बदलत असते; परंतु निरपेक्ष नीती ही सार्वत्रिक असते. जिथे जिथे मानवजात आहे, तिथे तिथे ती लागू पडते. उदाहरणार्थ, सत्य बोलणे हे सर्व धर्मांनी वा व्यक्तिसमूहांनी स्वीकारलेलेच असते.

विद्यमान भारतीय समाजात वेगवगळ्या परंपरा दिसत असल्या तरी ही प्रक्रिया अचानक घडलेली नाही. प्राचीनकाळापासून या देशात बहुविधता आढळून येते. पूर्वी अनेक राजसत्ता अस्तित्वात होत्या. वेगवेगळ्या राज्यांचे आपआपसांत अनेक कारणांनी युद्ध होत होते. त्यामुळेच, जरी सांस्कृतिक एकता असली, तरीही प्रशासकीय एकता नव्हती. इंग्रजांमुळे दळणवळणाची सुविधा आली. समान नागरिकत्वाच्या हक्काचा विचार सुरू झाला. स्वातंत्र्यलढ्यात वेगवेगळ्या प्रांतांतील क्रांतिकारक स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न करू लागले. त्यामुळे भारत देश एकसंघ राष्ट्र आहे ही भावना येऊ लागली. राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी विचार करताना तीन अंगांनी विचार करावा लागतो. देशातील नागरिक, जेव्हा देशावर परकीय आक्रमण होते तेव्हा एकत्र येतात, परंतु आक्रमण संपताच राष्ट्रीयत्वाची भावना ओसरली जाते. अशा परिस्थितीत राष्ट्रीय एकता जाणवेल, परंतु ती तात्पुरत्या स्वरूपाची जाणीव असते. काही वेळा राष्ट्रात विविध धर्म, जाती, वंश, भाषा असल्या तरीही, आहे ती परिस्थिती मान्य करून प्रत्येक घटकाची अस्मिता कायम ठेवून, राष्ट्रीय एकात्मतेचे धोरण राबविले जाते. मग त्यात महाराष्ट्राचे कोळी-नृत्य वा लावणी, गुजराथचा गरबा, पंजाबचा भांगडा, कथ्थक, भरतनाट्यम्, मणिपुरी व अन्य नृत्यप्रकार असतील तर हे सर्व स्वतंत्र अस्तित्व धरून, भारतीय नृत्याची संकल्पना साकार करण्याचा प्रयत्न होतो.

काही देशांमध्ये विविध घटकांमध्ये वेगवेगळेपण असले, तरी त्या वेगवेगळेपणाला दुय्यम समजले जाते; आणि मुख्य घटकाचे अस्तित्व समोर ठेवले जाते. याला फार तर एकरूपता म्हणता येईल. आपल्या देशात वेगवेगळ्या घटकांना स्वतंत्र मान्यता देऊनही देशाची संस्कृती प्रदर्शित केली जाते. राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी विचार करताना धर्म, भाषा, जात यांचाही विचार केला पाहिजे. धर्मासंबंधी सामान्य माणूस भावनिक असला तरीही काही अतिरेकी व्यक्ती वा व्यक्तिसमूह स्वार्थासाठी धर्माचा वापर करतात, त्यामुळे समाजात संघर्ष होतो, यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला बाधा येते.

भारतात ज्या विविध भाषा आहेत यांमुळेही काही वेळा आपआपसांत झगडे होतात. खरे तर बहुभाषिक देश असणे हे भूषण आहे, परंतु स्वातंत्र्यानंतर ज्या प्रमाणात वेगवेगळ्या भाषांमध्ये समन्वय साधून, एकता निर्माण करण्याचे प्रयत्न झाले ते अपूर्ण होते. प्रादेशिक भाषांवर इंग्रजीचे आक्रमण झाले. तसेच, हिंदी भाषिक व अहिंदी भाषिक अशी विभागणी होत गेली. यामुळे राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचा वापर ज्या प्रमाणात होणे अपेक्षित होते तसे झाले नाही. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने राष्ट्रभाषेला उत्तेजन असणे आवश्यक ठरते. आजही आपल्या देशात जातीयता आहे हे मान्य केले पाहिजे. अनेक जातसमूह या ठिकाणी असल्यामुळे नागरिकांत जसा जिव्हाळा असावयास पाहिजे तसा तो असत नाही. एवढेच नाही तर उच्च-नीचतेची भावना नागरिकांच्या वर्तनात दिसते. हे जातीयतेचे विष निवडणुकीच्या वेळी स्पष्ट दिसते. आतापर्यंत जातीयता कमी करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले, तरीही जाती टिकून आहेत. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने जातीय समाज असणे बरोबर नाही. याबरोबरच गरीब-श्रीमंत भेद असणे हेही राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने घातक आहे. आर्थिक समानता नसेल, तर चंगळवादी समाज, भूमिहीन शेतमजूर, असे भेद तयार होतील. भटक्या विमुक्त जातींचा समूह कल्याणकारी योजनांपासून अजूनही लांब आहे. आर्थिक प्रगतीची फळे सर्वांना समानरूपाने मिळतील तेव्हाच राष्ट्रीय एकात्मता साधली जाईल. भारतीय समाजात आदिवासी संस्कृतीचा विचार झाला पाहिजे. आदिवासी समाज अजूनही गरीब आहे. भांडवलदारांकडून त्याचे शोषण होते. शासनाच्या अनेक विकास योजना असूनही याचा लाभ ज्या प्रमाणात होणे अपेक्षित आहे ते होत नाही. ज्यांच्या हातात विकास योजना आहेत ते प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत जात नाहीत; आणि ज्यांच्यासाठी

विकास योजना आहेत असे आदिवासी लाभार्थी अज्ञानामुळे विकास योजनेपर्यंत पोहोचू शकत नाहीत किंवा लाभ घेऊ शकत नाहीत, असे हे दुष्टचक्र आहे. यामुळे राष्ट्रात जी एकता अपेक्षित आहे ती होत नाही.

सध्याच्या समाजात सामाजिक बांधिलकीचा अभाव मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे. वास्तविक पाहता, व्यक्तीवर समाजाचे अनेक उपकार असतात. त्याची परतफेड करणे हे आपले कर्तव्य आहे. व्यक्ती व समाज यांत एक प्रकारचे दृढ नाते आहे. समाजाशिवाय व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अपूर्ण आहे. अशी भावना निर्माण न झाल्यामुळे माणसे एकमेकांपासून दुरावतात. त्यामुळे देशाच्या एकात्मतेला धोका निर्माण होतो. काही व्यक्ती पैसा हेच सर्वस्व मानतात. दुसऱ्याच्या श्रमावर चैन करण्याची प्रवृत्ती वाढीस लागत आहे. अशामुळे सामाजिक विघटन होण्यास सुरुवात होते. महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' हा मंत्र दिला; पण त्याची अंमलबजावणी आपण म्हणावी तेवढी यशस्वी करू शकलो नाही.

शिक्षणव्यवस्थेत अपूर्णता असल्यामुळे अजूनही शिकलेल्यांना सामाजिक जाणीव येतेच असे नाही. शिकलेली माणसे निम्नस्तरावर असलेल्या लोकांशी बेपर्वाईने वागतात. शिकलेली माणसे आपल्या कुटुंबापासून, गावापासून, एवढेच नाही तर आपल्या अस्मितेपासून दूर जाताना दिसतात. आजच्या अभ्यासक्रमांत काही ज्ञानविस्तार उपक्रम राबविले जातात, परंतु एकूण व्यवस्थेच्या मानाने ते फार अल्प आहेत.

सामाजिक समता येण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे सांगितले की, ''या देशात राजकीय लोकशाही असेल परंतु जोपर्यंत सामाजिक समता नांदणार नाही तोपर्यंत या लोकशाहीला काही अर्थ नाही.'' हा विचार फार महत्त्वाचा आहे. इ.स. १९२९ साली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे विचार मांडले की ''तुम्ही जर म्हणत असाल की, मी प्रथम भारतीय आहे मग हिंदू आहे अथवा मुसलमान आहे तर ते चुकीचे आहे. हा विचार एकात्मतेला बाधक आहे वास्तविक अशी भूमिका घेतली पाहिजे की, मी प्रथम भारतीय आहे. आणि नंतरही भारतीयच आहे.'' यावरून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय एकात्मतेविषयीचे विचार समजून येतात, आणि आजच्या युवकांसाठी मार्गदर्शक ठरतात.

आपल्या देशात वेगवेगळे प्रांत आहेत. भारताने राजकीय क्षेत्रात बहुपक्षपद्धतीचा स्वीकार केला असल्यामुळे प्रदेशाप्रमाणे पक्ष निघताना दिसतात. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने राष्ट्रीय पक्ष वाढले पाहिजेत. प्रादेशिक पक्षांना राष्ट्रीय पक्षांनी सतत बरोबर घेतले पाहिजे. मूल्याधिष्ठित राजकारणाचा अभाव मोठ्या प्रमाणात दिसत आहे. त्यामुळे राजकीय जीवन संकुचित व गढूळ होताना दिसते. राजकारण मूल्याधिष्ठित झाले तर एकात्मता भक्कम होईल. म. गांधींनी मूल्याधिष्ठित राजकारण केले. त्यामुळे त्यांच्याबरोबर वेगवेगळ्या धर्मांतील, जातींतील लोकांनी अनुयायी म्हणून काम केले. निवडणुकीत एखाद्या मतदारसंघात ज्या जातीचे लोक अधिक असतील त्या जातीचाच उमेदवार देण्याचा पक्षांचा कल असतो. यामुळे जातीय भावना वाढीस लागते. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने हे घातक आहे.

आज समाजात बेकारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ज्याला गरज आहे त्याला नोकरी मिळतेच असे नाही. भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होण्यापेक्षा वाढत आहे. यातूनच मग भूमिपुत्रांना नोकरीत प्राधान्य देण्याची मागणी सुरू होते. तरुणांमध्ये कडवट वैफल्याची भावना निर्माण होते. आणि मग देशाची अखंडता धोक्यात येते.

वरीलप्रमाणे राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अनेक समस्या असल्या तरीही भारतीय समाज टिकून आहे. त्याची खास काही वैशिष्ट्ये आहेत. सहिष्णुता हा खास गुण आहे. येथे अनेक उपासनापद्धती, धर्म, पंथ असले तरीही ते एकमेकांचे वेगळेपण सांभाळून एकात्मतेने जीवन जगताना दिसतात. पूर्वीपासून चालत आलेल्या सहिष्णुतेमुळे भारतीय संस्कृती सर्वसमावेशक बनली आहे. खरे तर विविधतेत एकता साधणे ही अतिशय कठीण गोष्ट. पण भारतीय समाजाने ती सोपी करून दाखविली. भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात, ''परस्परांबरोबर सलोख्याने राहण्याची भारतीयांची प्राचीनकाळापासून परंपरा आहे. ही भारताची मूलभूत संस्कृती आहे. बुद्धाने फार पूर्वी आपणाला ही शिकवण दिली. सुमारे २३०० वर्षांपूर्वी अशोकाच्या काळापासून आपण हा विचार वेळोवेळी जाहीर केला असून आचरणात आणला आहे. आपल्या काळातही महात्मा गांधींनी धार्मिक सलोखा आणि सद्भावना यांच्यावर भर दिला, म्हणूनच आपणास एक मौल्यवान ठेवा जतन करायचा असून त्याविरुद्ध आपण वागू शकणार नाही.''

अशी ही सांस्कृतिक एकता अनेक वर्षांपासून चालत आलेली आहे. विविधतेत एकता हा आपला परंपरागत विचार नागरिकांनी जीवनात प्रत्यक्ष कृतीत आणला पाहिजे. गेल्या अनेक वर्षांत येथे अनेक संघर्ष झाले, तरीही समन्वयाची प्रवृत्ती आपण सोडली नाही. इंग्रजांविरुद्ध स्थानिक विविध लोकांनी संघर्ष केला. या वेळी सर्व लोक समन्वयाने राहिले. आपली परंपरा, संस्कृती जपत असतानाच नव्याचा स्वीकार करून समाजात प्रगतीही आलेली आहे. राष्ट्रीय एकात्मतेबद्दल भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचे विचार पुढीलप्रमाणे आहेत :

''राष्ट्रीय एकात्मतेची उभारणी विटा, माती आणि हातोड्याने होत नाही. लोकांच्या मनांत आणि हृदयांत या भावनेचा संथपणे विकास झाला पाहिजे; ही प्रक्रिया मंद आहे. पण ती संथ आणि कायमस्वरूपाची आहे.'' डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचे हे विचार भारतीय समाज कसा बदलतो हे दर्शवितात.

राष्ट्रीय एकात्मतेची ही एक जीवनशैली आहे. सर्व भेदभाव मान्य करून सर्वांना मान्य असा लोकशाहीवादी समाज निर्माण होणे हाच राष्ट्रीय एकात्मतेचा खरा अर्थ आहे.

**७. विशेष प्रयत्नांची गरज :**

राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्यासाठी मुद्दाम आवर्जून काही प्रयत्न करण्याची गरज आहे. शिक्षकांची अदलाबदल हा एक उपक्रम होऊ शकतो. एका राज्यातील शिक्षक दुसऱ्या राज्यातील शिक्षकांकडे सोयीप्रमाणे राहिल्यास त्या राज्यातील राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक व भौगोलिक परिस्थितीची सत्य स्थिती कळेल. त्यामुळे अध्ययनविषयक दृष्टिकोन बदलेल. राष्ट्रीय एकात्मतेत कोणकोणते अडथळे आहेत याची यथार्थ जाणीव होईल. शैक्षणिक संस्थांनी आर्थिक भार उचलला तर सदर उपक्रम सहज करता येईल. अशाच स्वरूपाचा 'विद्यार्थ्यांची अदलाबदल' उपक्रमही करता येईल. साने गुरुजी यांची आंतरभारतीची कल्पना एका अर्थाने अशीच आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मैत्री वाढते. पत्रव्यवहार सुरू होतो. दुसऱ्या राज्यातील परंपरा विद्यार्थ्यांना शिकता येतात, आणि आपआपसांत जिव्हाळा वाढतो.

आपआपसांतील भावनिक आत्मीयता वाढण्यासाठी वेगवेगळ्या प्रांतांतील विद्यार्थ्यांसाठी, श्रमसंस्कार शिबिरांचेही आयोजन करता येऊ शकेल. शिबिरांमधून

श्रमांचे महत्त्व तर कळेलच; परंतु जात, धर्म, पंथ, भाषा यांचे अहंकार आपोआपच पुसले जातील आणि आपण सर्व भारतीय बांधव आहोत, असा संस्कार रुजेल. या दृष्टीने आदरणीय प्रसिद्ध समाजसेवक बाबा आमटे यांनी आनंदवन व सोमनाथ प्रकल्प या ठिकाणी तरुणांची जी शिबिरे आयोजित केली, त्यांतून शेकडो तरुणांना एकात्मतेची प्रेरणा मिळालेली आहे, हे सांगता येईल. याबरोबरच रक्तदान शिबिरांचेही नियोजन करता येईल. आपण दिलेले रक्त कोणत्याही जाती, धर्मातील व्यक्तीला मिळणार आहे; आणि त्यामुळे कोणाचा तरी जीव वाचणारा आहे, अशी उदात्त भावना तरुणांमध्ये येईल.

आपल्या समाजात वेगवेगळे सामाजिक समारंभ आपण करीत असतो. अशा समारंभात आवर्जून वेगवेगळ्या जातिधर्मांतल्या लोकांना आपल्याकडे बोलावून सण-समारंभ साजरे केले तर त्यामुळे एकात्मतावाढीस मदत होते. विविध राज्यांचे जनजीवन जवळून पाहण्यासाठी सहलींचे नियोजन करता येईल. विविध राज्यांतील धर्मस्थळे, तीर्थस्थळे, पर्यटनस्थळे यांना भेटी देऊन गावांतील मंदिरे, चर्च, गुरुद्वार पाहून विविधतेचे अनुभव घेता येतील.

वेगवेगळ्या वर्तमानपत्रांमध्ये व नियतकालिकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेविषयीच्या बातम्यांचे संकलन करून ठिकठिकाणी सूचनाफलकांवर लावता येईल. अभ्यासक्रमांमध्ये मुद्दाम म्हणून राष्ट्रीय एकात्मतेचा विचार पाठ्यरूपांत घालून अध्ययन करता येईल. चित्रकला, संगीत, वादविवाद स्पर्धांमधून राष्ट्रीय एकात्मतेचा विचार प्रसारित करता येईल.

वेगवेगळ्या प्रांतांतील वेगवेगळ्या भाषा शिकण्यासाठी अभ्यासकांना प्रेरित करणे हासुद्धा राष्ट्रीय एकात्मतेला पोषक विचार आहे. तरुणवयात भाषा शिकण्याची ओढ असू शकते. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे शिक्षकांसाठी भाषाशिक्षण योजना राबविली जाते. आपल्या मातृभाषेव्यतिरिक्त एखादी भारतीय भाषा शिक्षकाला शिकावयाची असेल तर त्याला शिष्यवृत्ती दिली जाते.

वरीलप्रमाणे वेगवेगळ्या भाषांतील अतिउत्तम चित्रपट महाविद्यालयीन तरुण विद्यार्थ्यांना दाखविता येतील यासाठी फिल्म क्लबची स्थापना करता येईल. नागरिकांनी अशा उपक्रमांचा लाभ घेतला तर उदारमतवादी दृष्टिकोन होण्यास मदत होईल. सेवाभावी संस्था असे उपक्रम सहज राबवू शकेल.

जातीयवादी लोक दंगली घडवून आणतात. अशा वेळी नागरिकांनी अतिशय परिपक्व विचार करून, समाजाचे प्रबोधन करून, मनाचा तोल बिघडू न देता, सर्वधर्मसमभाव विचाराचा प्रसार केला पाहिजे. धर्मनिरपेक्ष राजकारण राजकीय पक्षाने केले पाहिजे. धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व लोकशाहीवाद्यांना कळले तर जातीयवाद गाडून टाकता येईल.

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने सर्वधर्म प्रार्थना वेगवेगळ्या शाळांमधून विद्यार्थ्यांना शिकविल्या गेल्या पाहिजेत. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचा संस्कार होऊ शकेल. याबरोबरच गरीब-श्रीमंतांतील दरी कमी करण्यासाठी गरिबी निर्मूलनाचा कार्यक्रम शासनाला हाती घेता येईल. आजच्या घडीला गरिबांसाठी अनेक योजना कार्यरत आहेत, परंतु त्यांची प्रभावी अंमलबजावणी ज्या प्रमाणात असावयास पाहिजे, ती होत नाही. त्यामुळे गरीब गरीबच राहत आहे, तर श्रीमंत अतिश्रीमंत होत आहेत. ही विषमतेची दरी वाढणे एकात्मतेला घातक ठरत आहे.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी खरे तर शिक्षणातून संस्कार होत गेले पाहिजेत; परंतु शिक्षणाने माणूस विशाल होण्यापेक्षा संकुचित होत चालला असेल तर ती गंभीर बाब आहे. प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर हात, डोके व हृदय यांच्या सुसंवादी विकासावर भर दिला पाहिजे. महात्मा गांधी यांना राष्ट्रीय एकात्मता आणण्यासाठी शिक्षणाचे माध्यम असावे असे वाटत होते. या दृष्टीने त्यांचा पुढील विचार महत्त्वाचा आहे :

''मला असे वाटते की, बुद्धीचे खरे शिक्षण हे हात, पाय, कान, नाक, इत्यादी शारीरिक अवयवांच्या प्रशिक्षणाद्वारा व योग्य वापराद्वाराच होऊ शकते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, मुलांच्या शारीरिक अवयवांचा हुशारीने वापर केला गेला तर त्यांच्या बुद्धीचा सर्वोत्तम व गतिमान असा विकास होतो. पण आत्म्याच्या जागृतीबरोबर मनाचा विकास हा केवळ एक दुबळा व एकांगी असा प्रकार होईल. आध्यात्मिक शिक्षण म्हणजे अंत:करणाचे शिक्षण असे मी समजतो. म्हणून मनाचा योग्य व सर्वांगीण विकास तेंव्हाच होऊ शकतो जेव्हा मुलांच्या शारीरिक व आध्यात्मिक शक्ती एकत्रितपणे विकसित होतात. त्यांचे एक अविभाज्य असे पूर्णत्व आहे. म्हणून या सिद्धान्तानुसार या घटकांचा स्वतंत्रपणे व पृथक असा विकास होईल असे समजणे ही फार चुकीची कल्पना ठरेल.'' *(हरिजन, ८ मे, १९३७, पृ. १०४)*

एकात्मतावाढीसाठी एकात्मता परिषद महत्त्वाची भूमिका बजावू शकते. इ.स. १९६० साली श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली एक राष्ट्रीय एकात्मता समिती स्थापन करण्यात आली. तसेच, १९६२ साली पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय एकता परिषदेची सभा झाली. जाती-जातींतील भ्रातृभाव, समता, राजकीय न्याय, इत्यादी मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न परिषदेने केला. राष्ट्रीय ऐक्याला अडथळा येणाऱ्या अनेक घटनांचा निषेध परिषदेने केला आहे. अशा राष्ट्रीय परिषदांची संख्या अनेक पटींनी वाढली पाहिजे तरच राष्ट्रीय ऐक्य होण्यास मदत होईल. भारतासारख्या खंडप्राय देशात प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. तसेच, केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध सलोख्याचे पाहिजेत. अज्ञान हाच राष्ट्रीय एकात्मतेचा सर्वांत मोठा शत्रू आहे. अज्ञानामुळे एकमेकांतील गैरसमजुती अधिक वाढतात. अज्ञानी व्यक्तीला चुकीचा विचार शिकविला जातो. त्यामुळे समाजात किरकोळ गोष्टींवरून वाद होतात आणि त्याचेच पर्यवसान दंगलीमध्ये होते; म्हणून अज्ञान घालविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. बाह्यशक्तींपासून देशात कोठे धोका आहे याची खडान्‌खडा माहिती जनतेला दिली पाहिजे. नोकरशाही कामाला कशी लागेल यासाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून कर्तव्याची जाणीव करून दिली पाहिजे. अल्पसंख्याक समाजाला नेहमी असुरक्षितता जाणवते. यासाठी समाजातील शहाण्या माणसांनी प्रयत्न करून त्यांच्यात विश्वास निर्माण केला पाहिजे.

आपण जेव्हा आपल्या देशात राष्ट्रीय एकात्मतेचा विचार रुजला पाहिजे असे म्हणतो, तेव्हा या राष्ट्रात राहणाऱ्या जनतेत, संघर्ष न होता, देश बलशाही करण्यासाठी झटतो, असे म्हणता येईल. या देशात सुख-शांती नांदली तरच आपला देश प्रगतीचा टप्पा गाठेल. ''भारत देश जुना आहे, परंतु राष्ट्र नवे आहे'' हा विचार महत्त्वाचा आहे *(पन्नालाल सुराणा : भारतराष्ट्राची जडणघडण, पृ. १७).* आपली संस्कृती कितीही प्राचीन असली तरीही एक राष्ट्र म्हणून आधुनिक जीवनातील ताणतणावांना तोंड द्यावे लागत आहे. एक स्वतंत्र लोकशाही राष्ट्र म्हणून उभे राहताना भूतकाळाच्या साचलेल्या पाण्यात फार अडकता येणार नाही. 'जुन्याची कास आणि नव्याचा ध्यास' याप्रमाणे समतोल साधावा लागेल. या दृष्टीने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांचे विचार मोलाचे वाटतात :

''आपला देश अत्यंत कठीण कालखंडातून वाटचाल करीत आहे. भारतीय जनतेवर माझा विश्वास असून आपली सर्वधर्मसमभावी लोकशाही त्यातून विजयी होऊन बाहेर पडेल याची मला खात्री आहे. सर्वधर्मसमभाव म्हणजे निधर्मीपणा नव्हे तर त्याचा अर्थ आहे सर्व धर्मांच्या प्रति समान आदर.'' *(त्रिवेंद्रम, २० डिसेंबर, १९६७).*

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अडचणी जरूर आहेत तरीही डॉ. झाकीर हुसेन यांनी भारतीय जनतेवर विश्वास व्यक्त केला आहे. कितीही वेगवेगळे धर्म असले तरीही लोकशाहीच्या मार्गाने प्रगती करता येईल, असे त्यांना वाटते. सर्वधर्मसमभाव हा दृष्टिकोन बाळगून आपआपसांतील मतभेद मिटविता येतात.

**८. सामाजिक लोकशाहीची गरज :**

भारतीय संविधान ही या देशाला मिळालेली फार मोठी देणगी आहे. आतापर्यंत अनेक वेळा अंतर्गत आणि बाह्य संकटे आली, परंतु आपला देश अखंड आहे, टिकून आहे. एवढेच नाही तर लोकशाहीमार्गाने आपण प्रगती करीत आहोत. संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तिसरे व शेवटचे भाषण झाले. या वेळी त्यांनी असे विचार मांडले की, ''आपण केवळ राजकीय लोकशाहीवर समाधानी राहता कामा नये. आपल्याला राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीत करावेच लागेल. सामाजिक लोकशाही निर्माण केली नाही, तर राजकीय लोकशाही फार काळ टिकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय?

सामाजिक लोकशाही हा एक असा जीवनमार्ग आहे की, ज्यात, स्वातंत्र्य, समता, व बंधुभावाची जीवनमूल्ये असतील. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या त्रिसूत्रीमधील तत्त्वे वेगवेगळी करता येणार नाहीत. ते या त्रिसूत्रीतूनच एक मिलाप घडवून आणतात. त्यातून कोणतेही एक काढून बाजूला केले की लोकशाहीचा पराभव होतो. समतेपासून स्वातंत्र्य बाजूला काढता येत नाही. स्वातंत्र्यापासून समता बाजूला काढता येत नाही. त्याचप्रमाणे बंधुत्वापासून स्वातंत्र्य, समता वेगळे करता येत नाहीत.''

*(संविधानसभेत डॉ. आंबेडकर, पृ.२८४).*

डॉ. बाबासाहेबांनी बंधुत्वाचा विचार अतिशय महत्त्वाचा मानला आहे. बंधुत्वाचा विचार असेल तरच आपण मानवतेकडे जाऊ शकतो. लोकशाही यशस्वी करावयाची असेल, तर बंधुत्वाशिवाय ते शक्य नाही. ''जेंव्हा बंधुत्व

वास्तवात येईल तेव्हा राष्ट्र निर्माण झालेले असेल.'' असा विश्वास याच भाषणामध्ये त्यांनी व्यक्त केला.

आता जागतिकीकरणाचे युग आहे. आपण सगळे वेगवेगळ्या निमित्ताने एकत्र येत आहोत. वेगवेगळ्या प्रांतांतील, राष्ट्रांतील व्यक्ती किंवा नागरिक पूर्वीपेक्षा अधिक वेळा एकत्र येऊन अनेक उपक्रम राबवित आहेत. ही एका अर्थाने चांगली दिशा आहे, परंतु त्यामुळे लगेच मानसिक एकता होईल असे नाही. त्यासाठी बंधुत्वाचा विचार व्यक्ती-व्यक्तींमध्ये रुजला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत तिसरे व शेवटचे भाषण करताना सांगितले की, ''आपण बंधुभावाच्या तत्त्वाला मान्यता दिली पाहिजे. बंधुभाव म्हणजे काय? भारतीयांना बंधुत्वाची सामाजिक जाणीव असणे या तत्त्वातूनच एकता निर्माण होते व अशी एकतेची भावनाच सामाजिक जीवनाला भक्कमपणा आणते.'' *(संविधानसभेत डॉ. आंबेडकर, पृ. २८५).*

आज कितीही समस्या असल्या तरीही डॉ. बाबासाहेबांचा वरील विचार आपण कृतीत आणला पाहिजे.

राष्ट्रीयत्वाचा विचार मोठ्या प्रमाणावर तरुण पिढीत रुजवायचा असेल तर विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये असे नवीन-नवीन उपक्रम केले पाहिजेत की, ज्यामुळे नवी पिढी याकडे आकर्षित होईल. उच्चशिक्षणाची तीन उद्दिष्टे आहेत - शिकविणे, संशोधन करणे, ज्ञानविस्तार करणे. ज्ञानविस्तार उद्दिष्टांच्या माध्यमातून समाजाच्या तळागाळापर्यंत जाऊन विद्यार्थ्यांना काम करता येते. विद्यार्थी जेव्हा समाजात जातो, तेव्हा तो पुस्तकांबरोबरच समाज वाचायला शिकतो. त्याचा दृष्टिकोन व्यापक होतो. समाजातल्या रूढी, परंपरा, त्याला समजतात. अनेक धर्मांच्या, जातींच्या लोकांशी त्याचा संबंध येतो. त्यामुळे सामाजिक जाणीव विकसित होते. असे तरुण जेव्हा संघटितरीत्या जाणीवजागृतीचा उपक्रम करतील तेव्हा सामाजिक परिवर्तन घडण्यास मदत होईल. हा देश एकत्र ठेवावयाचा असेल, स्वत:ची अस्मिता जपावयाची असेल, तर हे करणे आवश्यक आहे. या दृष्टीने भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे विचार मोलाचे वाटतात :

''या देशात आपणाला स्वत्व जपले पाहिजे. हा संपूर्ण देश एकत्र ठेवला तरच तो शक्य आहे. स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी, स्वातंत्र्यरक्षणासाठी आणि जनतेच्या हितासाठी तसेच इतर देशांच्या गरजेच्या घडीला उपयोगी

ठरण्यासाठी जे सामर्थ्य लागेल ते सामर्थ्य आपण जगाला दाखवू शकू. म्हणूनच, राजकीय ऐक्याचे महान मूल्य आपण समजून घेऊन हे ऐक्य आपणास शक्य तेवढ्या चांगल्या स्थितीत जतन करणे निकडीचे आहे. स्वातंत्र्यलढ्यानंतर प्राप्त झालेले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी लोकांना आपले कर्तव्य समजावे, अशी माझी कळकळ आहे. आज प्रत्येक भारतीयाचे हे प्राथमिक कर्तव्य आहे.'' *(मद्रास, ३ एप्रिल, १९५१).*

देशाचे ऐक्य टिकविले पाहिजे. स्वातंत्र्याच्या लढ्याची परिणती म्हणून नागरिकांना स्वातंत्र्य मिळालेले आहे. हे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत. आज समाजात कितीही विषमता असली, वेगवेगळेपण असले, आजूबाजूला अंधार असला, तरीही 'रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उष:काल' यावर विश्वास असला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेच्या उज्ज्वल मार्गाने हा विश्वास सार्थ ठरेल.

## संदर्भ सूची


१. डॉ. सुरेंद्र बारलिंगे : राष्ट्रीय एकात्मता, समाज शिक्षणमाला, ४८५, २०९५, सदाशिव पेठ, पुणे-३०.

२. अरविंद रेडकर : मूल्य शिक्षणाची नवी दिशा, लोकवाङ्मय गृह, भुपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५.

३. एस. अबीद हुसेन : अनुवाद : प्रकाश देशपांडे, केजकर : भारताची राष्ट्रीय संस्कृती, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली-११००१६.

४. प्र. द. पुराणिक : राष्ट्रीय व भावनात्मक एकता, साधना प्रकाशन, ४३०-३१, शनिवार पेठ, पुणे-३०.

५. पन्नालाल सुराणा : भारतराष्ट्राची जडण-घडण, सुगावा प्रकाशन, पुणे-३०.

६. आचार्य शं. द. जावडेकर : हिंदू-मुसलमान ऐक्य, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, १२, टिळक रोड, पुणे-२.

७. प्रा. डॉ. बाबुराव पवार : भारताची राष्ट्रीय एकात्मता, प्रताप प्रकाशन, ७, प्राजक्ता, विद्याधन, माणिकनगर, गंगापूर रोड, नाशिक-४२२००५.

८. जयदेव गायकवाड : संविधान सभेत डॉ. आंबेडकर, पद्मगंधा प्रकाशन, ३६/२, पूजा अपार्टमेंट्स, पांडुरंग कॉलनी, एरंडवणा, पुणे-४११०३८.

९. डॉ. न. म. जोशी : (बीजभाषण लेख) राष्ट्रीय एकात्मता : शोध आणि बोध; कृतिसत्र, राष्ट्रीय एकात्मता : संकल्पना व विविध पैलू, पुणे विद्यापीठ - प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग.

१०. बिंदुमाधव जोशी व राम बापट यांची व्याख्याने : कृतिसत्र : राष्ट्रीय एकात्मता : संकल्पना व विविध पैलू, पुणे विद्यापीठ -प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग.

११. संपादक : प्राचार्य रा. तु. भगत : श्री गाडगे महाराज गौरव ग्रंथ, चैतन्य प्रकाशन, १७५६-ए, ताराबाई रोड, साकोली कॉर्नर, कोल्हापूर-४१६००२.

१२. संपादक : प्राचार्य रा. तु. भगत : अमृतवाणी, सिद्धराज प्रकाशन, पुणे-४११०४६.


❑❑